**आधुनिक काळ -**

आधुनिक काळात ही जैनधर्माने भारतीय संस्कृतीत आपले स्थान कायम टिकविले आहे, जैन समाज भारतीय समाजजीवनाशी एकरुप झालेला आहे. भारतात ब्रिटीश सत्ता स्थापन झाल्यानंतर या पारतंत्र्याच्या जोखंडातून भारतीय समाजाची सुटका करण्याचे, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे जे प्रयत्न करण्यात आले, त्यात जैन समाजही समाविष्ट होता. कित्येकदा या राष्ट्रीय कार्यात या समाजातील काही पुरूषांनी आत्मार्पणही स्विकारलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाज सर्वांगिण क्षेत्रात जी प्रगती करीत आहे त्यात सहभागी होण्याचे कित्येकदा अग्रेसर बनण्याचे कार्य ही हा समाज करीत आहे. म्हणूनच आज भारतात राजकीय, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात या समाजातील काही व्यक्ती चमकताना दिसतात. भारताला त्याची पुर्वापार जगाला आध्यात्मिक क्षेत्रात नेतृत्व करण्याचे स्थान मिळावे अशी आजही या समाजाची अपेक्षा आहे. आध्यात्मिक क्षेत्रात जगाचे नेतृत्व करीत असताना भारताने वेज्ञानिक, औद्योगिक क्षेत्रातही जगाच्या मागे राहू नये, जगाची बरोबरी करण्याचा प्रयत्न करावा अशाी या समाजाची इच्छा आहे त्यासाठी भारताला सर्वांगिण क्षेत्रात परिपूर्ण बनविण्याचा कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात मदत करण्याचे कार्य हा समाज करीत आहे. म्हणून राजकीय क्षेत्राबरोबर औद्योगिक क्षेत्रही परिपूर्ण करण्याचे कार्य हा समाज करीत आहे. सामाजिक व शैक्षणिक संस्थांची स्थापना करुन समाजाची प्रगती घडवून आणण्याचा उच्च ध्येयाने हा समाज कटीबध्द झाला आहे. या विविघ क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींचा व त्यांच्या कार्याचा परिचय या ग्रंथाच्या शेवटच्या भागात आम्ही करून देणारच आहोत.

इतिहास अर्घ्य ही जैन समाजाच्या पराक्रमाची गाथा आहे. यात सत्ताधीश, त्यांच्या पत्नी, मांडलीक राजे या जैन धर्मीयांनी भारतीय संस्कृतीला किंवा समाजाला काय योगदान केले हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ही गाथा गाताना, या धर्माने जैन समाजाच्या व इतर भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी काय कार्य केले हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळेच यात जैन धर्माने केलेल्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रातील कर्तृत्त्वाचा समावेश झालेला आहे. जैन धर्माने केलेल्या राजकीय सामाजिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रातील कर्तृत्वाचा समावेश झालेला आहे. जैन धर्माचे योगदान स्पष्ट करीत असताना भारतातील इतर कोणत्याही धर्मावर किंवा पंथावर टीका करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला नाही. या उलट समन्वयता व परधर्मसहिष्णुतता हे वैशिष्टय असलेल्या भारतीय संस्कृतीतील, अनेकांतवादाच्या दृष्टीने जागाकडे पाहणाऱ्या जैन धर्माचे अस्तित्व कसे सहकार्यात्मक व मसन्वयात्क होते हे दाखविण्याचा हा एक प्रयत्न होता. भविष्यकाळातील समाजाला जैन धर्माची ऐतिहासिक परंपरा माहित व्हावी व ऐतिहासिक ग्रंथाचे लेखन होताना या इतिहाससिध्द धर्माचे अस्तित्त्व व महत्तव त्यात विसरले जाऊ नये ही या अर्घ्य लेखनामागील प्रामाणिक प्रेरणा आहे. ही प्रामाणिक प्रेरणा सफल झाल्याचा आत्मसमाधानाचा आनंद लेखनसमाप्तीसमयी निश्चितपणे मिळत आहे. आत्मसमाधान यताथ ॅ असल्याची पावती सूज्ञ वाचक देतील यात संदेह नाही१.

# जैनाचार्य

भारतीय जैन साहित्याला जीवदान देण्याचे अतिमहान कार्य जैनाचार्यानी केलेले दिसून येते. या आचार्यानी जर विविध ग्रंथ संपत्तीची रचना अथवा सांभाळ केला नसता तर, आज जे जैन साहित्य अपलबध आहे, ते राहिले असते किंबा नाही याविषयी शंका वाटते. जैनाचार्यानी जैन परंपरा टिकवून धरण्यामध्ये आपल्या प्राणांची आहुति देखील दिलेली दिसून येते. तपाचरणासाठी व ज्ञानार्जनासाठी त्यांना

सतत एका ठिकाहून दुसऱ्या ठिकाणी विहार करावा लागला. वाटेतील अनेक संकटाना तोंड धावे लागले. दतर दार्शनिकांच्या मतांचे खंडन स्तमत प्रतिपादन करण्यासाठी त्यांना आपली अभ्यासुवृत्ति सतत जागृत ठेवावी लागली. ज्ञानग्रहणाची ही पूर्वीच्या आचार्याची चिकाटी पाहून आजचे विव्दान् आश्चर्यचकित होतील यात कांहीच शंका नाही.

'आचार्य देवो भव' या वचनानुसार आचार्याचे स्थान देवासमान असल्याचे सहज सिध्द होते. प्राचीन काळी गुरु-शिष्याचा संबंध अतिशय जवळचा असून, शिक्षणासाठी शिष्याला गुरुच्या गृहीच रहावे लागत असे. याची उदाहरणे आपणला महाभारत रामायणातून देखील पाहावयास मिळतात. जैन आचार्य अथवा साधू मात्र शिष्यांच्यासह एके ठिकाणी निवास न करता सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी करीत असत. सर्व साधारण जनांना हितोपदेश करण्याचे महान कार्य करण्यात ते सतत मग्न होते.

तत्कालीन आचार्य तसेच शिष्य यांचे संबंध कसे होते, ते एकमेकांबरोबर कसे आदबीने वागत याविषयीची माहिती आपणाला आगमसाहित्यातील व इतर काही जैन ग्रंथातून पाहावयास मिळते. खरे आचार्य अथवा गुरु हे रत्नत्रय संपन्न असल्यामुळे पवित्र असतात. योग्य शिष्यावर प्रेम करणारे ते सर्व जीवांचे कल्याण करु इच्छिणारे असतात. ते स्वत: आचार-विचारांचे योग्य पालन करुन संसारुपी समुद्रातून स्वत: पार होतात व इतरांनाही तारुन नेतात.

जैनाचार्य सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विहार करीत असल्यामुळे त्यांच्या जन्मस्थानाविषयीची कालाविषयी अथवा कुलाविषयी माहिती एकत्रित करणे फार दुरापास्त होते. याशिवाय ते स्वत: प्रसिध्दी पराग्डमुख राहाण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळें त्यांच्या स्वत:च्या ग्रंथातून देखील त्यांची माहिती मिळत नाही. अशावेळी आपणाला त्यांचे जन्मस्थान, काल व कुल वगैरे बाबीविषयी माहिती मिळविण्यासाठी तत्कालीन साहित्य, त्यात आलेला त्यांच्याविषयीची उल्लेख, राजाश्रय, शिलालेखादि बाबींचा आधार घ्यावा लागतो. या सर्वाधारे देखील त्यांची वरील बाबीविषयी निश्चित माहिती मिळेलच असे नाही.

प्रस्तुत आचार्य खंडात आचार्य परंपरेविषयी माहिती देऊन एकूण महत्वाच्या अशा पंधरा आचार्याची ज्या ज्या आचार्यानी महान योगदार दिले आहे, जे जास्तीत जास्त लोकप्रिय व प्रसिध्द आहेत असे हे निवडक आचार्य घेतले आहेत. अर्थातच या आचार्याच्या जन्मस्थान, काल, गुरुपरंपरा, शिष्यपरंपरा व कुलपरंपरा या बाबीविषयींची निर्णायक माहिती देणे काही ठिकाणी कठीण झाले आहे. आशाठिकाणी विविध विव्दानांची मते व ग्रंथाधार देऊन जास्तीजास्त उचित व आधुनिक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे या कामी जैनेंद्रसिध्दांतकोश , जैन साहित्य आणि इतिहास यांवर प्रकाश टाकणाऱ्या काही ग्रंथाचा व मराठी, इंग्रजी, गुजराती ग्रंथाचा उपयोग केला आहे.

सूज्ञ वाचक यातील काही उल्लेखाशी सहमत न होण्याचीही शक्यता आहे. परंतु तरीसुध्दा फारसा मतभेद उरेल वाटत नाही. आचार्य परंपरेतील महान आचार्याची सर्व बाजूनी उचित व योग्य माहिती मिळविण्याचा व ती वाचकापुढ ठेवण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे एवढेच.

## जैन परंपरेतील आचार्याचे स्वरुप-

जैन परंपरेनुसार आचार्य परंपरेला अत्यंत मोलाचे स्थान देण्यात आले आहे. ही आचार्य परंपरा अगदी पूर्वीपासून चालत आलेली असून , आजसुध्दा ती पुढे चालू असल्याचे दिसून येते. जैनधर्मविषयक सर्व साहित्य सांभाळून ठेवण्याचे महान श्रेय आचार्य परंपरेलाच धावे लागते. अत्यंत कठिण अवस्थेत देखील नानाप्रकारे ही साहित्य संपदा जपून ठेवण्यामध्ये आचार्य परंपरेचा सिंहाचा वाटा असल्याचे

दिसून येते आणि म्हणूनच पंच नमसकारातील तिसरा व चौथा नमस्कार, या महान आचार्याच्या व उपाध्यायांच्या पदकमली अर्पण करण्यात आलेला दिसतो.

शब्द शास्त्राच्या विद्वानांनी आचार्याचा शब्दांर्थ 'आचारवान' असा दिला आहे. 'आचारं ग्राह्यत्याचिनोत्यर्थान् आचिनोति बुध्दिमिति वा ।' आर्थात् जो दुसऱ्याना आचारशील बनवितो, शास्त्रातील योग्य आर्थाचे अनुशीलन करतो, तसेच आचार व शास्त्र यांच्या ज्ञानाव्दारे बुध्दि परिमार्जित करतो तोच आचार्य म्हणविला जातो. आचार्य संघाचा संचालक मानला जात असून, तो कुशल, लोकव्यवहारज्ञ, दूरदर्शी आणि निपुण असावा. या त्याच्या गुणामुळे संघामध्ये गोधळ माजत नाही.संघाचा आचार्य कसा असावा याविषयी आगमामध्ये खालीलप्रमाणे विवेचन केले आहे-

पवण-जलहि-जलोयर-ण्हायामल-सुध्द छावासो । मेरुव्व णिप्पकंपो सूरो पंचणणो वज्जो॥
देस-कुल-जाइसुध्दो सोमंगो संग-भंग-उम्मुक्को । गयणव्व णिरुवलेवो आयरियो एरिसो होइ ॥
संगह-णिग्गह कुसलो सुत्तत्थ विसारओ पहियकित्ती । सारण-साहण-किरयुज्जुत्तो हु आयरियो ॥'

प्रवचनरुपी समुद्रातील जलात स्नान करण्यामुळे अर्थात् परमागमाच्या पूर्ण अध्ययनोने आणि अनुभवाने ज्याची बुध्दि निर्मल झाली आहे, जो निर्दोष पध्दतीने सहा आवश्यकांचे पालन करतो, जो मेरुप्रमाणे निष्कम्प आहे, शूर-वीर आहे, सिंहाप्रमाणे निर्भय आहे, आकाशाप्रमाणे निर्लेप आहे, तोच महापुरुष आचार्य होतो. (शिवाय) जो संघाचा संग्रह अर्थात् दीक्षा देण्यात, प्रायश्चित दंड देण्यात कुशल आहे, सूत्र व अर्थ विचारण्यात प्रवीण आहे, ज्याची कीर्ति सर्वत्र पसरली आहे व जो आचरण, निषेध तसेच व्रतांचे संरक्षण इत्यादि क्रियात मग्न असतो. अशीच व्यक्ति आचार्य होण्यास योग्य आहे.

**आचार्य प्रकार -** शास्त्रामध्ये आचार्याचे अनेक प्रकार सांगितले आहेत. राजप्रश्नीय सूत्रात तीन प्रकारचे आचार्य सांगितले आहेत. ' तओ आयरिया पण्णत्ता कलायरिए, धम्मायरिए, सिप्पायरिए अर्थात् कलाचार्य, शिल्पाचार्य व धर्माचार्य हे तीन प्रकार असून, धर्माचार्याचे काही प्रकार सांगितले आहेत.

आचार्याचे ज्ञान, उपशम, वैराग्य इत्यादि गुणांच्या अपेक्षेने चार प्रकार सांगितले आहेत. १) आवळयाच्या गोड फळाप्रमाणे, २) द्रक्षाच्या गोड फळाप्रमाणे असणारे , ३) खिरीप्रमाणे, ४) उसाच्या तुकड्याप्रमाणे (स्थानांग ४/३/३२०). आचार्याचे हे भेद उत्तरेत्तर श्रेष्ठ आहेत.

१) षट्प्रज्ञक गाथादिरुप सूत्रधारी व विशिष्ट क्रियाहीन असणारे २) ज्ञान अधिक नसताना सुध्दा वाणी चातुर्याने मुग्धजनांना प्रभावित ३) स्व-समय व पर-समय जाणणारे तसेच क्रियादि गुणांनी युक्त असणारे ४) आगमात वर्णित आचार्याप्रमाणे गुणांनी युक्त असणारे.

**आचार्य महति -** चौथ्या प्रकाराच्या आचार्याचे वर्णन करीत असताना 'दशवेकालिक' सुत्रात म्हटले आहे-

जहा निसंते तवणच्चिमाली, पभासई केवल भारहं तु ।
एवायारिओ सुयसील-बुध्दिए विरायइ सुरमज्झे व इंदो॥

ज्याप्रमाणे रात्रीच्या अंध:काराचा नाश करुन तप्त-किरणयुक्त सूर्य दिवसा एकटाच साऱ्या भरत क्षेत्राला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे अचार्य सुध्दा साऱ्या संघाला आपल्या तेजस्वी प्रकाशाने सदैव प्रकाशित करतो व इंद्र ज्याप्रमाणे देवामध्ये विराजित असतो त्याप्रमाणे तो आपल्या श्रुत, शील, बुध्दि यांच्या साह्याने संघात विराजमान होतो. पुनः ' दशवैकालिक' मध्ये म्हटले आहे- ' ज्याप्रमाणे शरद् पौर्मिमेतील

चंद्रमा, २८ नक्षत्र ८८ ग्रह आणि ६६९७५ कोटी तारकांच्या परिवाराने वेढलेला निर्मल मेघरहित आकाशात शोभायमान होतो, त्याप्रमाणे गणाचा स्वामी संघपति आपल्या संघातील साधूमध्ये शोभायमान होतो.

शरद् पौर्णिमेतील चंद्रम्याच्या बाबतीत असे म्हटले जाते की, तो अमृताचा वर्षाव करतो. म्हणूनच त्याला अमृतवर्षी असे म्हटले आहे. त्याच्या अमृतमयी किरणांच्या संपर्काने जंगलात उत्पन्न होणाऱ्या अनेक ओषधी अमृताने परिपूर्ण होऊन महान गुणशाली होतात. आजसुध्दा अनेक अनुभवी व प्राचीन वैध या अमृतवर्षी चंद्रम्याच्या प्रकाशात आपल्या औषधी ठेवतात. म्हणूनच त्या चंद्रम्याला औषधीश्वर असेही म्हटले आहे. याप्रमाणे अमृतवर्षी चंद्रमा ज्याप्रमाणे आपल्या सर्व परिवारासह गगनमंडळात शोभा प्राप्त करतो, त्याप्रमाणे सर्वगुण संपन्न आचार्य देखील मुनि मंडळाची शोभा वर्धित करतात.

तो चंद्रमा ज्याप्रमाणे शीतल आहे, अमृत वर्षाव करणारा आहे, आनंदोत्पत्ती करणारा आहे, प्रकाशमान आहे, म्हणूनच त्याला जगदानन्ददायक म्हटले आहे व संपूर्ण संसार त्याला पाहून आपला दाह करून शांतीचा अनुभव घेतो, त्याचप्रमाणे श्रावक-श्राविका व साधू, साध्वीरुप चतुर्विध संघाचा स्वामी आचार्य म्हणविला जातो.

निशीथभाष्यमध्ये आचार्याला ' रागद्दोस विमुक्को सीयघरसमोय आयरिओ ' अर्थात रागव्देषरहित समतायुक्त आचार्य शीतगृह समान असल्याचे म्हटले आहे. अशा आचार्याची सेवा समस्त श्रमण संघाकडून केली जोते.

**आचार्याचे छत्तीस गुण -** साधुंच्यापेक्षा आचार्याचे स्थान निश्चित्तपणे वरचे मानले आहे यात शंका नाही. कारण संघाची सर्व व्यवस्था व उन्नती ही आचार्यावर अवलंबून असते. आचार्य सर्वप्रकारे योग्य नसेल तर, संघही योग्य होऊ शकणार नाही. साधूच्यापेक्षा आचार्यांना उच्च स्थान देत असताना, साधूच्यापेक्षा काही अधिक गुणांची अपेक्षा देखील शास्त्रकारांनी ठेवली आहे. म्हणूनच शास्त्रकारांच्या मते साधूच्या साधारण गुणापेक्षा विशिष्ट अशा ३६ गुणांचा धारक असणे आवश्यक आहे. प्रवचन सारोध्दार (७२) मध्ये म्हटल्याप्रमाणे-

सछत्तीस गुण समग्गो णिच्चं आयरइ पंच आयारं ।सिस्साणुग्गहकुसलो भणिओ सो पूरी परमेट्ठी ॥

जो छत्तीत गुणांनी युक्त, पाच आचारांचे नित्य आचरण करतो आणि शिष्यावर अनुग्रह करण्यात कुशल असेल, तो आचार्य श्रेष्ठ मानला जात असे.

अष्टावाचारवत्वाधास्तपांसि व्दादशस्थिती ॥ कल्पादशाऽऽवश्यकानि षट् त्रिंशद गुणा गर्ण :॥

आचारवत्व आदि आठ गुण, अनशनादि बारा तप, आचेलक्य इत्यादि दशकल्प आणि सामायिकादि सहा आसश्यक हे आचार्याचे छत्तीस गुण मानले जातात. आगमानुसार असे म्हटले जातेकी, जो आचार्य या छत्तीस गुणांचे पालन करीत नाही, तो स्वत: धर्मापासून भ्रष्ट होतो व इतरांनाही धर्मापासून भ्रष्ट करतो. आचार्याच्या काही अन्य गुणांचे देखील कथन केले आहे.

पंचिदिय-संवरणो तह नवविहबंभचेरगुत्तिश्वरो। चंउव्विहकसायमुक्को इह अट्णरस गुणेहि संजुत्तो॥

सर्वप्रथम आचार्याने पाचही इंद्रियांचे दमन केले पाहिजे. एवढेच नव्हे तर. सर्वेद्रिव्य वश केली पाहिजेत. पाच इंद्रियांचे २३ विषय आणि ४० विकार सांगितले आहेत. जे या विषय, विकारापासून दूर

गेले आहेत त्यांना आचार्य म्हटले जाते. याशिवाय ब्रह्मचर्य, गुप्तीधारी, विविध प्रकाराच्या कषायापासून रहित व नानाविध गुणांनी युक्त अशा महान व्यक्तिलाच आचार्य म्हणावे.

भ. महावीरांच्यानंतर आपणाला आचार्याची परंपरा व्यवस्थित प्रकारे मिळू शकते. या परंपरेचा उल्लेख आपणाला विविध प्रकाराच्या पट्टावलीमधून देखील मिळतो. भ. महावीरानंतर क्रमशः गौतम, लोहार्य आणि जंबुस्वामी हे सर्वश्रुत जाणणारे व शेवटी केवलाज्ञानी झाले. त्यानंतर क्रमशः विष्णु, नंदिमित्र , अपराजित, गोवर्धन आणि भद्रबाहु हे पाच श्रुतकेवली झाले आणि त्यानंतर विशाखाचार्य, प्रोष्ठिल, क्षत्रिय, जय, नाग, सिध्दार्थ, धृतिषेण, विजय, बुध्दिल, गंगदेव व धर्मसेन हे ११ दशपूर्वधारी झाले. यानंतर सर्व अंग व पूर्वाचे एकदेश ज्ञान आचार्य परंपरा आ, कुंदकुंद, उमास्वामी, समंतभद्र, यतिवृषभ, रविषण, विधानंद, नामचंद्र, भट्टकिलक यांनी चालविलेला दिसते.

सर्व आचार्याची माहिती यचा एकाच ठिकाणी देणे शक्य होणार नाही, तसेच त उचित ठरणार नाही. म्हणून सामान्यतः पुढील फक्त १५ आचार्याची माहिती प्रस्तुत खंडात देण्याचा प्रयत्न केला आहे. ते आचार्य पुढीलप्रमाणे-

१) आ. कुंदकुंद २) आ. अमृतचंद्रसूरि ३)आ. जिनसेन ४) आ. उमास्वामी ५) आ. पूज्यपाद ६) आ. भूतबलि, पुष्पदंत ७) आ. यतिवृषभाचार्य ८) आ. नेमिचंद्राचार्य ९) आ. भट्टकलंक १०) आ. सिध्दसेन दिवाकर ११) आ. विधानंद १२) आ. हेमचंद्र १३) आ. कार्तिकेय १४) आ. रविषेन १५) आ. समंतभद्र.

## आचार्य पुष्पदंत व भूतबलि

आ. पुष्पदंत त भूतबलि हे दोन्ही आचार्य समकालीन होते. या दोन महान् आचार्यानीच षट्खंडागम ग्रंथाची रचना केली. षट्खंडागम या माहन् ग्रंथात या दोन्ही आचार्याच्या पितृमुल, मातृकुल अथवा गुरुविषयक परंपरेविषयी काही निश्चित माहिती मिळू शकत नाही. आ. वीरसेनाने षड्खंडागमवर लिहिलेल्या धवला टीकेत या दोन्ही आचार्याची अल्पशी माहिती दिली आहे.

आ. धरसेन षट्खंडागम ग्रंथातील विषयाचे ज्ञाते असून ते सोराष्ट्र देशातील गिरनारमधील चंद्रगुहेत ध्यान करीत होते. नंदिसंघाच्या प्राकृत पट्टावलीनुसार ते आचारांगाचे पूर्ण ज्ञाते असून, धवला टीकेनुकार ते अंग आणि पूर्व यातील काही भाग जाणत असावेत. अर्थात् यावरुन ते एक महान् विव्दान् होते. त्यांच्या पश्चात श्रूतज्ञानाचा लोप होईल, या भितीने त्यांनी आंध्रदेशातील महिमा नगरीच्या मुनिसंमेलनाला पत्र लिहिले . महिमा नगरीच्या यतिसंघाला हे पत्र मिळताच श्रुतज्ञानाची. जपणूक केली पाहिजे, हे जाणूण तेथून आपल्या संघातील स्मरणशील , विनयशील व कलापारंगत असे दोन साधु पाठविले. ते दोन साधु म्हणजेच पुष्पदंत व भूतवलि होत.

आ. पुष्पदंत व भूतबलि गिरिनगराला पोहचताच, धरसेनाचार्यानी त्यांची परीक्षा घेतली. त्यांनी एकाला अधिकाक्षरी व दुसऱ्याला हीनाक्षरी विधा कथन करुन, ती षष्ठ उपवासांनी सिध्द करण्यास सांगितली. जेव्हा विद्या प्रकट झाली, त्यावेळी एक मोठ्या दातांची व दुसरी एक डोळ्याच्या स्वरुपात प्रगट झ ाली विधेचे हे स्वरुप पाहताच, चतुर साधकांनी मंत्रात काहीतरी त्रुटी असल्याचे जाणले. त्यांनी त्या विधेची पुनः आराधना केली. त्यावेळी त्या विद्यादेवी सौम्य स्वरुपात प्रगट झाल्या. त्यांच्या त्या विद्येची पुनः आराधना केली. त्यावेळी त्या विद्यादेवी सौम्य स्वरुपात प्रगट झाल्या. त्यांच्या या कुशलतेवरुन ते दोघेही सिध्दान्त शिकण्यास पात्र असल्याचे धरसेनाचार्यानी जाणले आणि क्रमाने त्यांना सर्व सिध्दांत शिकविले. हा श्रुताभ्यास आषाढ शुध्द एकादशीला संपला . त्याचवेळी भूतांनी पुष्प, शंख, तूर्य इत्यादींची पूजा केली. यावरुन आ.

धरसेनांनी त्याचे नाव भूतबलि ठेवले. दुसऱ्याची दंतपंक्ति अस्ताव्यस्त होती, ती भुतांनी व्यवस्थित केली. यावरुन दुसऱ्याचे नाव पुष्पदंत ठेवले. हे दोनय पुष्पंदत व भूतबलि आचार्य म्हणजेच षट्खंडागमाचे कर्ते होत.

सिध्दांतअध्यन पुरे होताच व वर्षाकाल जवळ येत असल्याचे जाणून, धरसेनाचार्यानी आपल्या दोन्ही शिष्यांना निरोप दिला. धरसेनाचार्यानी या दोन शिष्यांना त्वरित निरोप का दिला असावा ते समजत नाही. इंद्रनंदीकृत श्रुतावतार व विबुध श्रीधरकृत श्रुतावतारानुसार धरसेनांना त्यांचा मृत्यु जवळ आला आहे व त्यांची अवस्था भूतबलि पुष्पदंत यांना पाहवणार नाही, मणून पाठविले असावे . त्याचबारोबर श्रुतज्ञानाचा त्वरीत प्रसार व्हावा या तीव्र अपेक्षेने त्यांनी या दोन आचार्याना पाठवून दिले असावे. यापुढे धरसेनांचे कोणतेच कार्य आपणाला दिसून येत नाही.

भूतबलि पुष्पदंत हे दोन्ही साधू पुढे अंकुलेश्वर येथे आले. तेथे चातुर्मास केला. तो संपल्यावर पुष्पदंत मुनि बनवास येथे गेले. तेथे त्यांनी जिनपालित यांना दीक्षा दिली व 'बीसदी' सुत्रांची रचना करुन त्यांना शिकवून भूतबलीजवळ पाठविले. भूतबलींनी पुष्पदंताचे आयुष्य थोडे शिल्लक राहिलेले ओळखून पुढील ग्रंथरचाना केली. याप्रमाणे पुष्पदंत भूतबलींनी ' षट्खंडागम' नामक सिध्दांत ग्रंथ लिहिले आणि हे 'षट्खंडागम' लिपीबध्द करुन ज्येष्ठ शु॥ पंचमीला त्याची शास्त्रपुजा केली. ही तिथी जैनांची श्रुतपंचमी म्हणून ओळखली जाते.

## गुरु-शिष्य परंपरा-

आ. पुष्पदंत व भूतबलि यांचे शिक्षागुरु धरसेनाचार्य असून त्यांच्या दीक्षा गुरुविषयीची माहिती मिळत नाही. धरसेनापूर्वी तीन केवली, पाच श्रुतकेवली, ११ दशपुर्वी, पाच एकादशांगधारी व चार आचारांगधारी आचार्य होऊन गेले. यांच्यानंतर समस्त अंगाचे आणि एकदेश पूर्वीचे ज्ञान आचार्य परंपरेने धरसेनाचार्याना प्राप्त झाले होते. धरसेनापसूनच पुष्पदंत, भूतबलीने ज्ञानप्राप्ती केल्याचा आपणाला स्पष्ट उल्लेख मिळतो. पुष्पदंताने बनवास येथे जिनपालिताला दीक्षा दिली व बीसदी सुत्रांची रचना करुन त्याला शिकविले. अर्थात् जिनपालिताचा दीक्षा व शिक्षागुरु म्हणून पुष्पदंताचाच उल्लेख करावा लागेल.

याशिवाय श्रवणबेळगोळ येथील शिलालेख नं. १०५ मध्ये पुष्पदंत आणि भूबलिला सपष्ट स्वरुपात संघकर्ता अर्हद्बलीचे शिष्य म्हटले आहे. आ. भुतबलि व पुष्पदंत यांच्या गुरु-शिष्य परंपरेबाबत यापेक्षा अधिक काही निश्चितपणे सांगता येत नाही. धवलाकाराने आपल्या टीकेतील मंगलाचरणात प्रथम भूतबलीला नमस्कार केला आहे. नंदीसंघाच्या पट्टावलीत देखील स्पष्टपणे भूतबलीला पूर्वपट्टाधिकारी म्हटले आहे. यावरुन पुष्पदंतापेक्षा भूतबलि आचार्य ज्येष्ठ असावेत हे स्पष्ट होते.

१. य:पुष्पदन्तेन च भूतबल्याख्येनापि शिष्यव्दितयेन रेजे । फलप्रदानाय जगज्जनानां प्राप्तोऽडकुराभ्यामिव कल्पभूज :॥ अर्हद्बलिस्संघचतुर्विधं स कोण्डकुन्दान्वयमूलसंघम् । कालस्वीावदिह जायमान व्देषेरात्मीकरणाय चक्रे॥

आचार्य भूतबलि व पुष्पदंत यांच्या कालविषयी नंदी आम्नायची पट्टावली प्रामाणिक मानली तर माधनंदी, धरसेन, भूतबलि, पुष्पदंत इ.आचार्याचा काल वीर निर्वाणानंतर ६१४ ते ६८३ हा असावा. नंदीसंघाच्या प्राकृत पट्टावलीनुसार व बृहट्टिपणाच्या संकेतानुसार देखील सर्वसाधारण हाच काळ गृहित धरला जातो.

## जीवन कथा-

विबुध श्रीधराने आपल्या श्रुतावतारमध्ये भविष्यवाणीच्या स्वरुपात आ. भूतबलीविषयी एक वेगळेच कथानक दिले आहे.

या भरतक्षेत्रात वांगिदेश असून त्यात वसुंधरा नावाची नगरी होती. तेथील राजा नरवाहन व राणी सुरुपा यांना नसल्यामुळे राजा उदास होता. तेव्हा सुबुध्दि नावाच्या व्यापाऱ्याने त्यांना पद्मावती देवीची पूजा करण्याचा उपदेश दिला. देवीची पूजा करण्यामूळे त्यांना पुत्रप्राप्ती झाली. त्याचे नाव पद्म ठेवले. नंतर राजाने सहस्त्रकुट चैत्यालय तयार करुन प्रतिवर्षी यात्रा करु लागला. व्यापाऱ्यांनी देखील अनेक जिनमंदिरे बांधली. त्याचवेळी वसंत ऋतूत सर्व संघ एकत्र येऊन आणि राजा सेठजीबरोबर जिनपूजा करुन रथ चालवू लागला. राजाने आपल्या प्रियमित्र मगधस्वामीला मुनींद्र झाल्याचे पाहून सुबुध्दिबरोबर वैराग्य धारण करुन, दीक्षा धारण केली. त्याचवेळी एक प्रेषित आला. त्याने जिनदेवाला नमस्कार करुन, धरसेन गुरुची वंदना करुन तेथे त्यांना पत्र दिले. त्यानुसार धरसेन हे नरवाहन व सुबुध्दि यांनी शास्त्राभ्यासाचे पठण, श्रवण व चिंतन करतून आषाढ शुक्ल एकादशीला शास्त्र संपविले . त्यातील एकाचा धरसेनांनी भूत रात्रीला बलिविधी केला व दुसऱ्याच्या चार दातांना सुंदर बनविले. म्हणून भूतबलीच्या प्रभावाने नरवाहन मुनीचे नाव भूतबलि आणि चार दात सारखे झाल्यामुळे सुबुध्दि मुनीचे नाव पुष्पदंत ठेवले. हेच ते भूतबलि-पुष्पदंत आचार्य असावेत परंतु प्रस्तुत कथा कल्पित वाटते.

## षट्खंडागम ग्रंथपरिचय-

' तन्मुनिव्दयं अंकुलेसुरपुरे गत्वा मत्वा षडंगरचना कृत्वा शास्त्रेषु लिखाप्य '...

या विबुध श्रीधरकृत श्रुतावतारातील उध्दरणानुसार पुष्पदंत भूतबलींनीच षट्खंडागमाची रचना अंकुलेश्वरात केली असावी हे स्पष्ट होते. षट्खंडागम ग्रंथला धवलाकाराने आपल्या ग्रंथाच्या उत्थानिकेत 'खंडसिध्दांत' असे म्हटले आहे. या ग्रंथाच्या खंडांची संख्या एकूण सहा असल्यामुळे त्याला ' षट्खंडसिध्दांत ' नावाने देखील संबोधिले आहे. श्रुतावतार कर्ता इंद्रनन्दीने याला 'षट्खंडागम' असेच म्हटले आहे. अर्थात् ग्रंथाच्या सर्वागाचे अवलोकन केले असता 'षट्खंडागम' हेच नाव उचित वाटते.

षट्खंडागमात एकूण ६ खंड आहेत ते पुढीलप्रमाणे इ १). जीवट्ठ २) खुद्दाबंध ३) बंधस्वामित्वविचय ४) वेदना ५) वर्गणा ६) महाबंध

१) **जीवट्ठाण-** या प्रथम खंडात सत्, संख्या, क्षेत्र , स्पर्शन, काल, अंतर, भाव,अल्पबहुत हे आठ अनुयोगव्दारे असून प्रकृति, जघन्य स्थिति, उत्कृष्ठ स्थिति, गति-आगति, इत्यादी ९ चूलिका आहेत. या ग्रंथात १८ हजार पद आहेत.

२) **खुद्दाबंध-** याला क्षुल्लकबंध असेही आहे. यात ११ अधिकारी आहेत. स्वामित्व, काल,अंतर, भंगविचय, द्रव्यप्रमाणानुगम, क्षेत्रानुगम, स्पर्शनानुगम, नाना जीव-काल, नाना जीव-अंतर, भागभागानुगम, अल्पबहुत्वानुगम इत्यादी. यात कर्मबंध करणाऱ्या प्रकारासहित वर्णन केले आहे.

३) **बंधस्वामित्वविचय -** या खंडात कोणत्या प्रकृतींचा कोणत्या जीवाला किती बंध होतो. कोणाला होत नाही. बंधरुप किती आहेत. इत्यादी कर्मासंबंधी विषयांचे विवेचन जीवाच्या दृष्टिने केले आहे.

४) **वेदना -** या खंडात मंगलाचरण पुनः घेतले आहे. कृति आणि वेदना हे अनुयोगव्दार याच खंडाच्या अंतर्गत येतात. परंतु वेदना कथानकाची प्रधानता अधिक असल्यामुळे

या खंडाला वेदना खंड म्हटले आहे. कृतीचे नाम, स्थापना, द्रव्य, गणना, ग्रंथ, करण, भाव हे सात प्रकार असून वेदनेचे निक्षेप नय, नाम, द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, प्रत्यय, इ. १६ अधिकाराव्दारे वर्णन केले आहे.

५) **वर्गणा-** या खंडात बंधनीय अंतर्गत वर्गणा अधिकारशिवाय स्पर्श, कर्म, प्रकृति आणि बंधनाचा प्रथम भेद 'बंध' या अनुयोगव्दारांचा अंतर्भाव केला आहे. यात एकूण २३ वर्गणांचे वर्णन आहे.

६) **महाबंध-** यात एकूण तीस हजार सुत्रे असून, यात प्रकृतिबंध, अनुभागबध व प्रदेशबंध या बंधांचे विस्ताराने वर्णन केले आहे.

वरील सहा खंडांनी ' षट्खंडागम' युक्त असुन अनेकविध गोष्टींचे त्यात सूक्ष्मपणे विवेचन केले आहे. अर्थात् पुष्पदंत-भूतबलि आचार्यानी हे एक महान कार्य केले हे अमान्य करता येणार नाही.

१) **कुंदकुंदरचित परिकर्म टीका-** ही षट्खंडागमावरील प्रथम टीका असून, पहिल्या तीन खंडावर ती लिहिली आहे. या टीकेत एकूण १२ हजार श्लोक. परंतु ही अस्तित्वात नसल्याचे प्रखरतेने आढळते.

२) **शामकुंडकृत पध्दती-** या टीकेचा उल्लेख इंद्रनंदीने केला असून, त्याचा कर्ता शामकुंड आहे. ही टीका शेवटचा ६ वा खंड सोडून प्रथम पाच खंडावर लिहिली आहे. ही टीका पध्दतीरुपाने लिहिली आहे. या टीकेत १२ हजार श्लोक असून ती संस्कृत, प्राकृत, कानडी दोन्ही सिध्दांतावर लिहिली असून, तिचे नाव ' चुडामणि' सुंदर, मृदु आणि संस्कृत असावी.

३) **चुडामणिकर्ता तुम्बुलूराचार्य-** या टीकेचे कर्ते ' तुम्बुलूर' असून ते 'तुम्बुलूर' नावाच्या एका सुंदर गावात राहात होते. यांनी सहावा खंड सोडून दोन्ही सिध्दांतावर टीका लिहिली असून, तिचे नाव 'चूडमणि' होते. मृदु आणि संस्कृत असावी.

४) **समंतभद्रस्वामीकृत टीका-** धवला टीकेच्या शेवटी आपणाला ९ गाथा पहावयास मिळतात. त्या गाथानुसार 'धवला' टीकेचे कर्ते आ.वीरसेन असावेत. ते सिध्दांत, छंद, व्याकरण, प्रमाण, न्याय व शास्त्र इत्यादीत निपुण असून, भट्टारक पदाने विभूषित होते. नरेंद्रचूडामणीच्या राज्यात राहून त्यांनी ही टीका लिहिली असावी. ही एक अत्यंत महत्वपूर्ण टीका समजली जाते. ही टीका कार्तिक महिन्यातील धवलपक्ष त्रयोदशीला समाप्त झाली. म्हणूनच या टीकेचे नाव ' धवला' ठेवले असावे. वीरसेनांच्या हातून अपुरा राहिलेला भाग जिनसेनांनी पूर्ण केला.

षट्खंडागमवरील विविध प्रकारच्या टीका अणि त्यात असणारा महान विषय यावरुनच या ग्रंथाची महती आपणाला समजते. अर्थात् धरसेनाचार्याकडून विधा प्राप्त करुन पुष्पदंत व भूतबलि या गुणज्ञ आचार्यानी या महान ग्रंथाची रचना केली व मुमुक्षु लोकावर फार मोठे उपकार केले . हे कदापि विसरता येणार नाही.

## आचार्य कुंदकुंद

प्राकृत भाषेचे महान् विव्दान्, जैनसाहित्य व संस्कृतीचे पुरस्कर्ते आणि सिध्दांत साहित्याचे एक प्रमुख आचार्य म्हणून कुंदकुंदाचे नाव अत्यंत प्रसिध्द आहे. आचार्य कुंदकुंद हे मूलसंघातील नंदिगणाचे प्रमुख आचार्य होते. द्रवीड गण व सेनागणातील आचार्य व दिगंबर साधू आपणास कुंदकुंदान्वयाचे म्हणवून घेतात. मंगलकार्याला शुभारंभ करीत असताना 'मंगलं कुंदकुंदाध्यो ' म्हणून त्यांचे नामस्मरण केले जाते.

त्यांचा नामोल्लेख मंगल स्वरुपाचा मानला जाव असुन, भ. महावीर व गौतम गणधर यानंतर त्यांचे मंगलमय नाव घेतले जाते हे आपणाला खालील श्लोकावरुन दिसून येते-

मंगलं भगवान् वीरो मंगलं गौतमो गणी।
मंगलं कुंदकुंदार्यो जैनधर्मोस्तु मंगलं ॥

## जीवन कथा-

आ. कुंदकुंदाच्या जीवनाविषयीच्या प्रमुख तीन कथा पाहावयास मिळतात- १) प्रो. चक्रवर्ती यांनी पंचास्तिकाय ग्रंथाच्या प्रस्तावनेत पुण्याश्रव कथेवरुन दिलेली कथा. २) पंडित नाथूराम प्रेमी यांनी 'ज्ञानप्रबोध' ग्रंथाव्दारे दिलेली कथा. ३) ब्रह्मनेमिदत्ताच्या 'आराधना कथाकोष' मध्ये शास्त्रदानाच्या फलाविषयी दिलेली कथा. या तीन कथामध्ये कुंदकुंदाच्या जन्माविषयी व जीवनाविषयी वेगवेगळी माहिती दिली आहे. पंडित नाथुराम प्रेमी यांनी ज्ञानप्रबोध ग्रंथाव्दारे दिलेली कथा कुंदकुंदाच्या जीवनाशी अधिक मिळती जुळती वाटते.

मालव देशात बारापूर नगरात कुमुदचुंद्र राज राज्य करीत होता. त्याच्या राणीचे नाव कुमुदचंद्रिका. त्याच्या राज्यात कुंद नावाचा वैश्य व्यापारी रहात होता. त्याच्या पत्नीचे नाव कुंदलता. त्यांना एक पुत्र झाला. त्याचेच नाव 'कुंदकुंद' होय.

एकदा 'जिनचंद्र' आचार्य त्या नगरात आले . आचार्याच्या उपदेशाचा कुंदकुंदांच्या मनावर परिणाम झ ाला व तो त्यांचा शिष्य बनला. मुनिश्वरांनी कुंदकुंदास वयाच्या ३३ व्या मुनिदीक्षा देऊन आचार्यपद देखील दिले.

कुंदकुंदाच्याविषयी एक मान्यता प्रचलित आहे ती अशी- एकदा आगमात शंका निर्माण झाली. तेव्हां त्यांनी विदेह क्षेत्रातील भ. सीमंधर स्वामीचे दिव्यध्वनी सुरु असतानाच 'सध्दर्मवृध्दिरस्तु' असा कुंदकुंदाना आशिर्वाद दिला. दोन चारणमुनींच्या सहाय्याने ते सातशे स्त्री-पुरुषांना दीक्षा दिली. श्वेतांबराबरोबर वादविवाद झाला. शेवटी ब्राह्मी देवतेने दिगंबर निर्ग्रथ मार्गच खरा मार्ग आहे हे मान्य केली.

जयसेनाचार्याने पंचास्तिकाय टीकेत कुंदकुंदाला कुमारनंदी सिध्दांत देवाचा शिष्य मानले आहे, तर श्रमणबेलगोल शिललेखात व विधानंदीच्या 'प्रमाण परीक्षा' ग्रंथात कुमारनंदी कुंदकुंदाचार्याचे गुरु असल्याचे सांगितले आहे. नंदीसंघाच्या पट्टावलीमध्ये जिनचंद्रालाच कुंदकुंदाचे गुरु म्हटले आहे. परंतु या गुरु शिष्य परंपरेबाबत समर्थन पुरावा मिळत नाही. उलट कुंदकुंदाचार्यानी 'बोधपाहुड' ग्रंथाच्या शेवटी स्वतःला गुरु भद्रबाहुचे शिष्य म्हणवून घेतले आहे. तसेच त्यांचे शिष्य राजा शिवकुमार यांच्या विनंतीवरुन त्यांनी 'समयसार' इत्यादी ग्रंथाची रचना केली असावी.

इ.स. १३८६ च्या विजयनगरच्या शिलालेखात व नंदिसंघाच्या पट्टावलीध्ये आचार्य कुंदकुंदाचे पद्मनंदि, कुंदकुंद, वक्रग्रीव, एलाचार्य व गुध्रपिच्छ इत्यादि परंपरागत पाच नावे आढळतात. कुंदकुंदाचे दीक्षेच्या वेळचे नाव मात्र पद्मनंदि असावे. याविषयीची माहिती देवसेनाचार्यानी 'दर्शनसार' ग्रंथात दिली आहे.

आचार्यांच्या कालाविषयी पं. नाथुराम प्रेमी, डॉ, पाठक, डॉ. चक्रवर्ती, आचार्य जुगलकिशोर मुख्तार इ. विद्वानांनी आपापली मते मांडली आहेत. या सर्व विद्वानांच्या मताचे अवलोकन करुन डॉ. ए. एन. उपाध्ये

यांनी आ. कुंदकुंदाचा काळा इ. स. पूर्व पहिल्या शतकाच्या उत्तरार्धात व इ. स. पहिल्या शतकाच्या पूर्वाधात मानला आहे. सर्वसाधारणपणे कुंदकुंदाचा काल वि. सं. दुसरे शतक मानला जातो.

ग्रंथसंपत्ती-

आचार्य कुंदकुंदाचे विचार जैन सिध्दांत व जैन दर्शनाचे आधारभूत मानले जातात. त्यांच्याशी तन्मय झाल्याशिवाय जैन आचार विचारांचे यथार्थ स्वरुप समजू शकत नाही. दिगंबर जैन साहित्यामध्ये षट्खंडगम-धवल-महाधवल-जयधवल यानंतर आचार्य कुंदकुंदाच्या साहित्याचे परंपरागत प्राचीनता व प्रमाणता या दृष्टीने फार महत्वाचे स्थान समजले जाते. वैदिक धर्मात उपनिषदांचे जे स्थान आहे तेच जैन साहित्यात आचार्य कुंदकुंद यांच्या साहित्याचे आहे. यांच्या प्राभृत आदि ग्रंथात 'जैन-उपनिषद' म्हटले तर अतिशयोक्ति ठरणार नाही.

आ. कुदंकुंद आध्यात्मतत्वाचे पुरस्कर्ते होते. 'समयसार' ग्रंथा आत्मतत्वाचे केलेले विवेचन सर्व जैन वाडमयात उत्कृष्ट ठरले आहे. जैन तत्वज्ञानाच्या अभ्यासकांना ते मननीय आहे. 'द्रव्य-गुण-पर्याय यांचे स्पष्टीकरण करुन त्यांनी जीवाचे मूळ शुध्द स्वरुप काय आहे. यावर चांगला प्रकाश पाडला आहे. कर्माच्या संयोगात जीवाचे जे नानाविध रुप आहे ते जीवाचे शुध्द स्वरुप नाही. ध्रुव स्वभावाची जाणीव, रुचि त्यामध्ये निरंतर स्थिरवृत्ती हाच संसारातून मुक्त होण्याचा मार्ग आहे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही'. असे कुंदकुंदाचार्यानी प्रतिपादले आहे.

आ. कुंदकुंदाची ग्रंथसंपत्ती फार विशाल व महत्वपूर्ण असून ती प्रमाणभूत मानली जाते. सामान्य लोकांना सहज समजावा म्हणून त्यांनी आपला उपदेश अर्धमागधी-प्राकृत भाषेतून सांगितला. जैन साहित्याची आगम प्रणाली प्रामुख्याने दोन प्रकारची आढळून येते. १) प्रथम श्रुतस्कंध, २) द्वितीय श्रुतस्कंध.

प्रथम श्रुतस्कंधामध्ये-प्रथमानुयोग (चरित्र पुराणे), चरणानुयोग (आचार संहिता) यांचे वर्णन आहे.

द्वितीय श्रुतस्कंधात प्रामुख्याने द्रव्यानुयोग, समयसार, प्रवचनसार इत्यादी ग्रंथाचा समावेश होतो.

आ. कुंदकुंदाच्या नावाने अनेक ग्रंथ असल्याचे दिसतात. परंतु त्यापैकी पुष्कळशा ग्रंथाची फक्त नावेच उपलब्ध आहेत. आचार्य कुंदकुंदानी 'धवला टीका' ग्रंथावर देखील 'परिकर्मसूत्र' टीका रचली आहे, परंतु टीकाकाराचा प्रत्यक्ष नामोल्लेख नसल्यामुळे त्याविषयी विद्वानांचे एकमत नाही. त्यांनी आपल्या ग्रंथसंपत्तीला 'पाहुड' (प्राभुत) असे म्हटले असून, मोक्षलक्ष्मीसाठी अर्पण केलेली ही भेट आहे असा त्या 'पाहुड' शब्दाचा संकेतार्थ सूचित केला आहे, त्यांचे साहित्यिक ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत-

**१) चौऱ्याऐंशी पाहूड-** या ग्रंथात कुंदकुंदाचार्यानी ८४ प्रकरणाचा उल्लेख केला आहे असे समजतात. पण आज तो ग्रंथ तर राहोच त्यांची ८४ नावेही उपलब्ध नाहीत. अष्टपाहूडांची नावे उपलब्ध असूत ती अनुक्रमे १) दंसण पाहुड, २) चरित्र पाहुड, ३) सुत्तपाहुड, ४) बोधिपाहुड, ५) भावपाहुड, ६) मोक्षपाहुड, ७) शीलपाहुड, ८) लिंगपाहुड अशी त्यांची नावे आहेत. नावाप्रमाणेच त्यामध्ये विषयाचे विवेचन केले आहे.

**२) षट्खंडागम टीका-** कुंदकुंदानी षट्खंडागम ग्रंथावर 'परिकर्म' नावाची टीका लिहिली. विबुध श्रीधर यांचे मते या ग्रंथाचा कर्ता कुंदकुंदाचार्याचा शिष्य कुंदकीर्ति हा असावा.

**३) दशभक्ति-** प्रचलित दशभक्ति पाठ किंवा क्रियाकलाप ग्रंथ दैनंदिन, पाक्षिक, सांवत्सरिक प्रतिक्रमणेच्या अपेक्षेने अत्यंत महत्वाचा समजला जातो. यातील भक्तीची प्राकृत रचना आचार्य कुंदकुंद यांनी केली असून संस्कृत भक्तींची रचना 'पूज्यपाद' यांनी केली आहे.

१) सिध्दभक्ति - चिरंतन अबाधित सुखाचे वर्णन.
२) श्रुतभक्ति - ११ अंगे व १४ पूर्व यांचे सविस्तर वर्णन
३) चारित्रभक्ति - मुनींच्या २८ मूलगुण व उत्तर गुणांचे वर्णन.
४) योगिभक्ति - योगी-मुनि-तपस्वी यांच्या तपाचे व सिध्दांताचे वर्णन
५) आचार्यभक्ति - दर्शनाचर इ. ५ प्रकारच्या आचारांचे वर्णन.

६) निर्वाणभक्ति - दुसरे नाव निर्वाणकांड. यामध्ये कोणत्या निर्वाणक्षेत्री किती मुनि मोक्षास गेले याचे वर्णन.

७) पंचमहा गुरुभक्ति - यात पाच परमेष्ठींची स्तुति केली आहे.

८) शांतिभक्ति - या भक्तित श्री शांतीनाथ तीर्थकरांची स्तुति केली आहे.

९) नंदीश्वर भक्ति - या भक्तीत नंदीश्वर द्वीपातील अकृत्रिम चैत्यालयाचे वर्णन करुन त्याची स्तुती केली आहे.

१०) समाधिभक्ति - समाधियोगाचे वर्णन.

बारस अणुवेक्खा - अनुप्रेक्षांच्या शेवटच्या गाथेत कुंदकुंदानी आपला उल्लेख केला आहे.

१) अनित्य, २) अशरण, ३) संसार, ४) एकत्व, ५) अन्यत्व, ६) अशुचित्व, ७) आस्त्रव, ८) संवर, ९) निर्जरा, १०) लोक, ११) बौधिदुर्लभ, १२) धर्म. इ. बारा अनुप्रेक्षा असून त्यांचे निश्चयनय व व्यवहारनयाच्या दृष्टिकोणातून विवेचन केले आहे.

**५) पंचास्तिकाय -** यात जीव, अजीव, धर्म, अधर्म, आकाश या पंचास्तिकायांचे वर्णन केले आहे. गुण, पर्याय, ध्रौव्य यांचा संबंध स्पष्ट केला असून, शेवटी चूलिकेत मोक्षमार्गाचे वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे सम्यक्दर्शनाच्या प्रकरणात सप्ततत्वाचे कथन, व्यवहार व निश्चय मोक्षमार्गाचे सरळा, सुंदर, निरुपण या ग्रंथामध्ये आढळते, त्यात अमृतचंद्राचार्यानुसार १७३ व आ. जयसेनानुसार १८१ गाथा असून प्रथमतः पीठिका व अंती चूलिका आहे. इतर काही आचार्यांच्या गाथा यात समाविष्ट केल्या असाव्यात.

**६) रयणसार -** या ग्रंथात एकूण १६२ श्लोक आहेत. त्यामध्ये काही अपभ्रंश गाथा प्रक्षिप्त स्वरुपात आढळून येतात. गृहस्थी व मुनी यांचे वर्णन यात केले आहे. शैली व भाषा कुंदकुंदाना अनुरुप नसल्याचे विद्वानांचे मत आहे. हा ग्रंथ कुंदकुंदाचा नसावा असे डॉ. उपाध्येसह अनेकांचे मत आहे.

**७) नियमसार -** हा ग्रंथ १८७ गाथांनी युक्त आहे. सम्यग्दर्शनचारित्र हा नियमाने मोक्षमार्ग आहे. त्याचे कथन या ग्रंथामध्ये असल्यामुळे त्याला नियमसर नाव दिले आहे. समयसारातील प्रतिपाद्य विषय वेगळया दृष्टिकोणाने समोर ठेवला आहे. व्यवहारचरित्र, आलोचना, प्रत्याख्यान, सामायिक आवश्यक आदींचे विवरण निश्चयनयाच्या प्रधानतेने केले आहे. ज्ञानत्व, सर्वज्ञत्व यांचे निरुपण करुन दर्शन ज्ञानासंबंधीचा महत्वाचा ऊहापोह केला आहे. कारणानेच कार्याची सिध्दी होते हे स्पष्ट करुन जसे मुख तसे त्यचे प्रतिबिंब, जसा गुणस्वभाव तसा त्याचा पर्याय असतो. आत्म्याचे शुध्द स्वरुप जाणल्यानेच मोक्षप्राप्ती होते. हे प्रतिपादन केले आहे.

**८) प्रवचनसार -** हा ग्रंथ ज्ञानाधिकार, ज्ञेयाधिकार व चारित्राधिकार या तीन भागात विभागला आहे. प्रथम ज्ञानाधिकारामध्ये आत्म्याचा ज्ञान स्वभाव आणि सुख स्वरुपाचे निरुपण असून अंती ज्ञानानंदरुप आत्म्याच्या प्राप्तीचा मार्ग सांगितला आहे. दुसऱ्या ज्ञेयतत्वाधिकारामध्ये पहिल्या २२ गाथेमध्ये सत्ता, द्रव्यगुणपर्यायादिकांचे सामान्य ज्ञेयतत्वाचे निरुपण आहे. तिसऱ्या अधिकारामध्ये श्रमणांच्या चरित्र चित्रणाचे वर्णन केले आहे. शेवटी सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र यांचा मौलिक ऊहापोह असून मोक्षमार्गाचे सुंदर विवेचन केले आहे. 'चारित्तं खलु धम्मो'

असे म्हणून चारित्र्यालाच धर्म म्हटले आहे. प्रवचनसारावर अमृतचंद्राचार्यांनी 'तत्वदीपिका' नामक टीका लिहीली असून जयसेनची 'तात्पर्य वृत्ती' नावाची टीका आहे, हा ग्रंथ आधारभूत व सारभूत मानला जात असून त्यात आध्यात्म दृष्टीकोणाचा सर्वत्र आविष्कार आहे.

**९) समयसार** - हा एक सर्वोत्तम ग्रंथ मानला जातो. या ग्रंथातील विषयाचे विवेचन साधारणपणे पुढील ११ अधिकारात केले आहे - १) जीवाजीवाधिकार, २) कर्ताकर्माधिकार, ३) पुण्यपापाधिकार, ४) आस्त्रवाधिकार, ५) संवराधिकार, ६) निर्जराधिकार, ७) मोक्षाधिकार, ८) सर्वविशुध्द ज्ञानाधिकार, ९) स्याद्वादाधिकार, १०) साधनसाध्य भावाधिकार.

प्रत्येक अधिकाराच्य नावानुसार त्यांचे वर्णन एकूण ४१५ गाथांच्या सहाय्याने केले आहे. शुध्द आत्म्याचे स्वरुप कसे असते याचेच वर्णन प्रस्तुत ग्रंथात केले आहे. त्याचबरोबर जैनधर्माचे स्वरुप स्पष्ट करुन तो इतर धर्मापेक्षा कसा श्रेष्ठ आहे हे सांगितले आहे. समयसारातील आत्मख्याती टीकेमधील कलशावर पं.

राजमलजी पांडे देशभाषामध्ये टीका केली आहे. त्याच कलशावर पं. बनारसीदासांनी 'समयसार' नाटक काव्याची रचना केली. समयसार ग्रंथ अमृत नाटयरुपाने सांगितला आहे.

आ. कुंदकुंदाच्या पंचास्तिकाय समयसार व प्रवचनसार यांना 'नाटकमय' अथवा 'प्राभृतमय' म्हणतात. ग्रंथत्रयीचा प्रधान हेतु निश्चयमोक्षमार्गाची रक्षा करणे व आत्मप्रधान उपदेशाने साधकाना मोक्षमार्गात स्थिर करणे हा आहे. या ग्रंथातून तात्विक व आध्यात्मिक चर्चा खूप केली आहे. आचार्याचे हे जैनसाहित्य जैनतत्वज्ञानाच्या प्राथमिक अभ्यासकाला योग्य नाही. कारण त्यात काही शब्दांचा अर्थ गहन व उच्च कोटीचा आहे.

आ. कुंदकुंदाची भाषा अत्यंत सरळ व वर्ण्य विषयाला एकदम स्पर्श करणारी आहे. तिला अलंकारादिंचा विशेष फुलोरा नसून विषय स्पष्ट करण्यासाठीच ग्रंथामध्ये प्रसिध्द लौकिक दृष्टांत दिले आहेत. शैली, प्रसन्न, गंभीर, सरळ व हृदयाचा ठाव घेणारी आहे. शब्दांचे अवडंबर न मोजविता मोजक्या शब्दात एखादी गोष्ट स्पष्ट करणे ही त्यांच्या ग्रंथाची विशेषता आहे. तत्वविरोधी प्रवृत्तीचे दिग्दर्शन आणि खंडन ते स्पष्टपणे करतात. तथापि ते कुणालाही बोचक वाटत नाही. तत्व आणि मोक्षमार्ग यांच्या मौलिक विवेचनामुळे कुंदकुंदाचे सर्वच साहित्य आणि त्यातला त्यात 'ग्रंथमयी' साधकाला कल्पवृक्षाप्रमाणे अथवा चिंतामणीप्रमाणे आहे.

आ. कुंदकुंदाच्या या ग्रंथत्रयीवर अमृतचंद्र आणि जयसेन यासारख्या मोठया आचार्यानी टीका लिहिल्या. त्यामुळे कुंदकुंदाचार्यांच्या अगाध विषयांचे ज्ञान सहज सुलभ झाले. त्यांच्या भाषेचे सूक्ष्म अवलोकन केले असता अत्यंत प्रौढ, डौलदार व गंभीर वाटते. वर्ण्यविषयाचा प्रत्येक कप्पा अगदी खुला करुन दाखविला आहे. सर्व विवेचनास तार्किकतेची बैठक आहे. शंतरसाच्या भूमिकेवर अध्यात्माचा महान आशय त्यांच्या लेखणीतून उतरला आहे. आ. कुंदकुंदाचार्यासारखे तत्वविवेचक आणि अमृतचंद्र व जयसेन यांच्यासारखे टीकाकार असा समसमासंयोग दुर्मिळच. त्याचे साहित्य भ. महावीरांच्या दिव्यवाणीप्रमाणे आहे. त्यांची एक एक गाथा जणू मौल्यवान रत्न आहे. ग्रंथरुपाने आध्यात्मिक व तात्विक गोष्टींची माहिती देऊन त्यांनी मुमुक्षु जीवावर महान उपकार केले आहेत. त्यांची ज्ञानज्योत अशीच प्रज्वलीत व चिरंतन राहो.

आ. उमास्वामी

आ. उमास्वामी हे आचार्य कुंदकुंदांचे पट्टशिष्य असून ते विक्रम संवत तिसऱ्या शतकात होऊन गेले. त्यांनी जैनसिध्दान्त संस्कृत साहित्यात निबध्द करुन 'तत्वार्थसूत्र' नामक महान ग्रंथाची रचना केली. श्रवणबेळगोळ येथील शिलालेख न. १०८ मध्ये असा उल्लेख आहे की, कुंदकुंदार्चाच्या पवित्र वंशात सर्व पदार्थाचे ज्ञाते

श्री उमास्वामी आचार्य झाले. ते मुनिश्रेष्ठ होते. जिनदेवप्रणीत सर्व शास्त्रांचा अर्थ सूत्ररुपाने त्यांनी एकत्र केला. प्राणीमात्रांच्या रक्षणात ते अतिशय सावधान होते.

आ. उमास्वामींनी कमीत कमी लिहून जास्तीत जास्त प्रसिध्दी मिळविली. त्यांना श्वेताबर आणि दिगंबर या दोन्ही शाखांची मान्यता आहे. दिगंबर परंपरेत त्यांना 'उमास्वामी' म्हणतात, तर श्वेतांबर परंपरेनुसार त्यांना 'उमास्वाति' असे म्हणतात. दिगंबर परंपरेनुसार उमास्वामींना कुंदकुदांचे शिष्य मानले असून श्वेतांबर पंथीयांचीही थोडीफार तशीच भावना आहे. तरीसुध्दा श्वेतांबर पट्टावलीत अथवा १० व्या शतकाच्या पूर्वीच्या दिगंबर ग्रंथ पट्टावली अथवा शिलालेखात उमास्वामींचा विशेष उल्लेख मिळत नाही. उमास्वामीसारख्या महान ग्रंथकाराविषयी अशी अनिश्चित त्रोटक माहिती असणे म्हणजे एक दुर्भाग्यच म्हणावे लागेल.

**आ. उमास्वामीचे जीवन -**

कोणत्याही महान लेखकांची, कवींची अथवा विद्वानांची माहिती मिळविताना आपणाला त्यांचा पूर्व इतिहास पहावा लागतो. जन्मवंश व विद्यावंश यांचे अवलोकन करुन जीवनकालविषयक माहिती गोळा करावी लागते.

आ. उमास्वामी हे एक प्रमुख आचार्य मानावे लागतील. आचार्य गृध्दपिच्छ उमास्वामींच्या 'तत्वार्थसूत्र' या ग्रंथास जैन समाज जितका परिचित आहे, तितकाच त्यांच्या जीवनाविषयी अपरिचित आहे. विद्वानांनी खूप प्रयत्न करुन देखील त्यांची निश्चित व खरी अशी माहिती मिळू शकत नाही.

आ. उमास्वामींचा परिचय श्वेतांबरी तत्वार्थधिगमसूत्र या ग्रंथात मिळतो. त्याशिवाय उमास्वामींनी स्वत: प्रशस्तीमध्ये लिहिलेला श्लोक आपणास पहावयास मिळतो.

न्यग्रोधिकाप्रसूतेन विहरता पुरवरे कुसुमनाम्नि ।कौभीषणिना स्वातितनयेन वात्सीसुतेनार्घ्यम् ॥

या श्लोकावरुन असे दिसते की, उमास्वामींचा जन्म 'न्यग्रोधि' नामक नगरीत झाला असून, त्यांच्या पित्याचे नाव स्वाति आणि मातेचे नाव वात्सी असे होते. गोत्राने ते 'कौभिषिणी' होते.

एकदा विहार करीत असताना त्यांची मयूरपिंछी न कळत गमविली गेली. त्या वनामध्ये मयूरपिंछ न मिळाल्यामुळे त्यांनी प्राणीरक्षणाचे साधन म्हणून गृध्रपिंछी धारण केली. तेव्हापासून त्यांना लोक 'गृध्रपिच्छाचार्य' या नावाने संबोधू लागले.

**गुरु-शिष्य परंपरा** -

प्रशस्तीमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे उमास्वामींचे विद्यागुरु व दीक्षागुरु यांच्याविषयी आपणाला माहिती मिळते. डॉ. हर्मन जाकोबीसारख्या महा विद्वानांनी देखील या प्रशस्तीला मान्यता दिली आहे.

वाचकमुख्यस्य शिवश्रियः प्रकाशयशसः प्रशिष्येण । शिष्येण घोषनन्दिक्षमणस्यैकादशङ्गविद:॥

वाचनया व महावाचकक्षमणमुण्डपादशिष्यस्य । शिष्येण वाचकाचार्यमूलनाम्नः प्रथितकीर्ते ॥

या श्लोकावरुन वाचकमुख्य शिवश्री, घोषनंदी, उमास्वाती ही त्यांची दीक्षागुरुंची परंपरा तर, मुंडपाद, वाचकाचार्य मूल, उमास्वामी ही त्यांची विद्यागुरुंची परंपरा दिसून येते. प्रशस्तीवरुन उमास्वामी हे 'उच्चनागर' शाखेचे असल्याचे दिसतात.

**काल -**

आ. उमास्वामींच्या कालाविषयी त्यांच्या प्रशस्तीमध्ये कसलीही माहिती मिळत नाही. त्यांच्या कालाविषयी विचार करण्यासाठी दुसरेही एखादे योग्य साधन नाही. अशा परिस्थितीमध्ये आपणाला पुढील तीन गोष्टींची साह्यता घ्यावी लागते - १) शाखा निर्देशन २) प्राचीन टीकाकारांचा काळ ३) अन्य दार्शनिक ग्रंथाची तुलना.

आ. उमास्वामी 'उच्चनागर' शाखेचे असल्याचा उल्लेख आपणाला मिळतो. परंतु ती शाखा कधी सुरु झाली हे निश्चयपूर्वक सांगता येत नाही. कल्पसूत्राच्या स्थविरावलीमध्ये या शाखेचा उल्लेख आहे. ही शाखा आर्य शांतिश्रेणीपासून निघाली असावी. शांतिश्रेणीक हे आर्य सुहस्तींच्या पासून चौथ्या पिढीत मोडतात. आर्य सुहस्तींचा स्वर्गवास महानिर्वाणानंतर २९१ वर्षांनी झाला व व्रज यांचा स्वर्गवास महावीर निर्वाणानंतर ५८४ वर्षांनी झाला दरम्यान २९३ वर्षाच्या काळात पाच पिढया उपलब्ध होतात. स्थविरावलीच्या आधारे एवढेच म्हणता येईल की, वाचक उमास्वामी महानिर्वाणानंतर ४७१ अर्थात विक्रम संवताच्या अगोदर किंवा त्याच्या आसपासच्या काळात झाले असावेत.

तत्वार्थसूत्र या महान गंथावर अनेक टीका लिहिल्या गेल्या. त्यापैकी 'सर्वार्थसिध्दी' ही आ. पूज्यपाद स्वामींची सर्वात प्राचीन टीका आहे. पूज्यपादांचा काळ विक्रम संवत ५ ते ६ वे शतक मानला जातो. यावरुन उमास्वामींचा काळ विक्रम संवत ५ व्या शतकाच्या पूर्व मानावा लागतो.

आ. उमास्वामींच्या 'तत्वार्थसूत्र' ग्रंथाची तुलना इतर काही ग्रंथाशी केली असता, तत्वार्थसूत्रातील सुत्रे व कणाद सूत्रे यांच्यात बरेच साम्य दिसते. कणादाची सूत्रे इ. स. पहिल्या शतकात लिहिली गेली असावीत. म्हणून आ. उमास्वामींचा काळ कणादाच्या दरम्यान मानावयास हरकत नाही. याशिवाय उमास्वामींचा काल ठरविण्यासाठी पंतजलीच्या सूत्राशीही तुलना केली आहे. काही ठिकाणी गणित पध्दतीने सुध्दा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात आ. उमास्वामी हे कुंदकुंदाचार्यानंतर इसवी सनाच प्रथम शतकाच्या शेवटी व स्वामी समंतभद्र आचार्यांच्या अगोदर म्हणजे इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या प्रारंभी होऊन गेले असावेत असे इतिहासकारांचे मत आहे.

**ग्रंथरचनेची प्रेरणा** -

आ. उमास्वामींना 'तत्वार्थसूत्र' या महाग्रंथाची रचना करण्यासाठी प्रेरणा कशी मिळाली याविषयी देखील अनेक बाबींचा उल्लेख वेगवेगळया ग्रंथातून आलेला दिसतो.

एकदा 'न्यग्रोधि' गावातून निघून फिरत फिरत आ. उमास्वामी कुसूमपूर नगरात आले. तेथे त्यांनी तुच्छ शास्त्रामुळे हतबध्द झालेले लोक पाहिले. त्यांच्याविषयी दया उत्पन्न होऊन व त्यांना काहीतरी मार्गदर्शन

करावे म्हणून आ. उमास्वामींनी 'तत्वार्थसूत्र' हा ग्रंथ लिहिला. जो या ग्रंथाचे वाचन व मनन करतो त्याला बाधारहित सुंदर मोक्षाची प्राप्ती होईल असे समजले जाते.

आ. उमास्वामींच्या ग्रंथरचनेविषयी दुसरी एक गोष्ट सांगितली जाते ती अशी आहे-

सौराष्ट्र देशात गिरी नावाच्या गावात सिध्दय नावाचा विद्वान राहात होता. तो शास्त्रांना जाणणारा व स्वहित पाहाणारा होता. त्याने एकेकाळी 'दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग:' असे एक सूत्र तयार करुन एका भिंतीवर लिहिले. त्याचवेळी श्री. गृध्दपिच्छ उमास्वामी त्याच्या घरी येऊन आहार घेतला. तेव्हा त्यांची नजर त्या सूत्रावर गेली आणि त्यांनी त्या सूत्राआधी 'सम्यक्' हा शब्द लिहिला. नंतर ते निघून गेले. सिध्दय बाहेरुन आला आणि त्याने 'सम्यक्' हा शब्द पाहिला. तो वाचून तो सिध्दय खूप आनंदित झाला. त्याने आपल्या आईस सम्यक् शब्द लिहिणाऱ्या विद्वानासंबंधी विचारले. तेव्हा आईने निर्ग्रंथाचार्यासंबंधी माहिती सांगितली. त्यांचा शोध घेत घेत सिध्दय आचार्य उमास्वामीजवळ येऊन पोहचला आणि नतमस्तक होऊन त्याने आत्म्याचे हित काय आहे असे विचारले. तेव्हा उमास्वामी म्हणाले 'मोक्ष'. तेव्हा त्याने मोक्षाचे स्वरुप व तो प्राप्त करण्याविषयीची माहिती विचारली. त्याच्या प्रश्नाचे उत्तर म्हणून आ. उमास्वातींनी 'तत्वार्थसूत्र' या ग्रंथाची रचना केली.

**आ. उमास्वाती व तत्वार्थसूत्र** -

आ. उमास्वाती 'तत्वार्थसूत्र' व त्यावरील भाष्य याशिवाय आणखी काही ग्रंथ लिहिले किंवा काय याविषयी काही माहिती मिळू शकत नाही. आ. उमास्वाती तीव्र बुध्दीचे व प्रचुर विद्वत्तेचे गाढे पंडित होते यात शंका नाही. जैनवाडमय इतिहासावरुन असे दिसून येते, संस्कृतमध्ये सूत्र रचना करणारे आ. उमास्वाती हे प्रथम आचार्य होत. शेकडो ग्रंथाचा सार काढून त्यांनी 'तत्वार्थसूत्र' ग्रंथाची रचना केली आहे.

आ. उमास्वाती लिखित 'तत्वार्थसूत्र' या एका महान ग्रंथाच अभ्यासाने जैन सिध्दांताचे सर्व रहस्य पूर्णपणे ज्ञान होते. वैदिक लोकात जे महत्व गीतेस, मुसलमानात जे महत्व कुराण या ग्रंथास, ख्रिस्त लोकात जे महत्व बायबल ग्रंथास आहे, तितकेच महत्व जैन परंपरेत तत्वार्थसूत्र या ग्रंथास आहे. या ग्रंथाचे दुसरे नाव 'मोक्षशास्त्र' आहे. हा संस्कृत भाषेतील सर्वप्रथम जैनग्रंथ होय. या ग्रंथाचे महत्व म्हणजे या ग्रथावर दोन हजार वर्षात लिहिल्या गेलेल्या शंभरापेक्षा जास्त टीका होत.

जैन आगम साहित्याचे कर्तानुयोग, कर्मानुयोग, प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग असे सहा महत्वाचे विभाग पाडले आहेत. तत्वार्थसूत्राचे स्थान या सहा अनुयोगातील शेवटच्या द्रव्यानुयोगात सर्वप्रथम आहे. तत्वार्थसुत्र ग्रंथाची तुलना ब्रह्मसूत्राबरोबर केली जाते. उपनिषदाचा आधार घेऊन अनेक विद्वानांनी ब्रह्मसूत्रावर टीका लिहिल्या आहेत. त्याप्रमाणे दिगंबर-श्वेतांबर पंथातील विद्वानांनीही तत्वार्थसूत्र ग्रंथावर अतिशय महत्वपूर्ण टीका लिहिल्या आहेत. मात्र ब्रह्मसूत्रातील जगत्, जीव, ईश्वर इत्यादी तत्वज्ञानाविषयी विद्वानांचा जो मतभेद आहे, तितका मतभेद तत्वार्थसूत्रांचे अनुकरण करणाऱ्या दिगंबर-श्वेतांबर परंपरेत दिसून येत नाही.

'तत्वार्थसूत्र' हा ग्रंथ एकूण १० अध्यायात विभागला असून त्याचे प्रामुख्याने ज्ञानमीमांसा, ज्ञेयमीमांसा व चारित्रमीमांसा या तीन भागात विभाजन केले आहे. या ग्रंथात एकूण ३५७ इतकी सूत्रसंख्या आहे.

'सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग:' या सुंदर व अतिशय महत्वपूर्ण सूत्राने त्यांनी आपल्या ग्रंथाला सुरुवात केली आहे. त्यानंतर मोक्ष हा सर्वाना इष्ट आहे. प्रत्येक प्राणी सुखासाठी धडपड करीत आहे. पण त्याला सुखाची इच्छा असतानाही आजपर्यंत सुखाची प्राप्ती का झाली नाही व ती कशाने होईल हे सर्व प्रथम सांगण्यासाठी प्रस्तुत सूत्राची रचना सर्वात प्रथम झाली आहे. मोक्षाविषयी कोणाचा विवाद नसून मोक्षमार्गाविषयी वादग्रस्त प्रश्न आहे. निरनिराळे धर्मपंथ निरनिराळा मोक्षमार्ग सांगतात. तेव्हा खरा मोक्षमार्ग कोणता तो आ. उमास्वातींनी पहिल्या सूत्रात दाखवून दिला आहे.

कार्यसिध्दि ही कार्याच्या शोधाने कार्याच्या विचाराने होत नसून कारणाच्या शोधाने व विचार-आचाराने होते. हा वस्तुस्वभावसिध्दांत लक्षात घेऊन मोक्षकार्याचा मागै प्रथम सूत्रात विचारात घेतला आहे. मोक्षासाठी जग धडपडत असले तरी त्याचा मार्ग चुकला आहे. त्यामुळे आजपर्यंत जीवाला मोक्षप्राप्ती झाली नाही. हे लक्षात घेऊन आचार्यांनी प्रथम सूत्रातच जगाला खरा मोक्षमार्ग कोणता हे दाखविले आहे. ज्ञानमीमांसेच्या पहिल्या टप्प्यात नय व प्रमाणानुसार मति, श्रुति, अवधि, मन:पर्यय, केवल इ. सम्यक् ज्ञानाचे प्रकार सांगून कुमति, कुश्रुति, कुअवधि या तीन मिथ्याज्ञानासह एकूण आठ प्रकार सांगून नयाचे भेदोपभेद

सांगितले. अर्थात् सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र या तिन्हींची एकता होणे म्हणजेच मोक्षमार्गाची प्राप्ती करणे हे आवर्जून सांगितले आहे. अर्थात् या विभागात प्रामुख्याने तर्कज्ञान व मानसशास्त्र यांचे स्पष्टीकरण केले आहे.

ज्ञेयमीमांसेत जगातील जीव, अजीव या मुख्य दोन जगन्मूल गोष्टींचे वर्णन केले आहे. जीव तत्वविषयक चर्चा २, ३, ४ या तीन अध्यायात आली आहे. दुसऱ्या अध्यायात संसारी जीवांची माहिती असून, त्यांचे भेदोपभेद सांगितले आहेत. तिसऱ्या अध्यायात अधोलोकात असणारे नरक, मध्यलोकात असणारे मनुष्य, पक्षी आणि पाताळातील अनेक विषयांचे वर्णन केले आहे. एकंदरीत या अध्यायांच्य मधून भौगोलिक माहिती देण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न केला आहे. चौथ्या अध्यायात देवसृष्टीचे वर्णन केले असून, दिव्य धामांचे व समृध्दीचे वर्णन केले आहे. पाचव्या अध्यायात सामान्यरुपाने द्रव्य चर्चा केली आहे. एकूण १६ गोष्टींचे यथास्थित वर्णन करण्याचा प्रयत्न या ज्ञेयमीमांसेत केलेला दिसतो.

चारित्र्यमीमांसेत ६ ते १० पर्यंतच्या अध्यायांचा समावेश असून, त्यात प्रमुख १२ गोष्टींचे विवेचन केले आहे. आस्त्रवाचे स्वरुप, त्याचे भेद, त्याच्याशी बांधली जाणारी कर्मे, व्रतांचे स्वरुप, त्यांचे भेद, व्रतात संभवणारे दोष, दानाचे स्वरुप, त्याचा हेतू, संवर, त्याचे भेदोपभेद, निर्जरा वगैरे गोष्टीचे विवेचन केले आहे. वाईट प्रवृत्तीचे मूल बीज कोणते ? वाईट प्रवृत्तीचे सेवन करणाराला कोणते फळ मिळते ? वाईट प्रवृत्तींचा नाश करण्याचा उपाय कोणता ? या प्रश्नांची यथायोग्य उत्तरे देण्याचा प्रयत्न या अध्यायातून केला असून, शेवटी केवलज्ञानाचा हेतू व मोक्षाचे स्वरुप व मुक्ति वगैरे गोष्टींचे सुंदर विवेचन केले आहे.

'तत्वार्थसूत्र' ग्रंथातील काही सुत्रे म्हणजे रत्नेच होत. अति अल्प शब्दात महान तत्वज्ञानाचा व रहस्याचा साठा करुन ठेवलेला आपणाला दिसून येतो.

'प्रमाणनयैः अधिगमः' या एका सूत्रावर, सर्व न्यायशास्त्रांची रचन कशी आहे. 'गुण-पर्ययवद् द्रव्यं' अथवा 'उत्पाद-व्यय-ध्रौव्ययुक्तंसत्' व 'सद् द्रव्यलक्षण' या दोन सूत्रावर सर्व द्रव्यानुयोग शास्त्रांची व अध्यात्म शास्त्रांची रचना झाली आहे. तसेच व्रतांचे लक्षण सांगून 'देशसर्वतोणुमहती' या सूत्रावरुन सर्व आचारधर्म शास्त्रांची रचना झाली आहे. शिवाय 'कायवाडमनःकर्म योगः स आस्त्रव' व 'प्रकृतिस्थित्यनुभागप्रदेशास्तद्विधयः' यातून अनुक्रमे आस्त्रव व बंधाचे स्वरुप स्पष्ट करुन सर्व कर्मसिध्दांत शास्त्रांची रचना झाली आहे. 'गागर मे सागर' या उक्तीप्रमाणे सर्व जैनसिध्दांत शास्त्ररुप महासागर या केवळ 'तत्वार्थसूत्र' नामक एका घागरीमध्ये भरला आहे. असा हा अद्वितीय व अनुपम असा ग्रंथ आहे.

थोडक्यात तत्वार्थसूत्र ग्रंथात जीवादी सात तत्वांचे निरुपण तसेच जैनधर्मासंबंधी सर्व गोष्टींचे वर्णन आहे. ज्ञान, नय, प्रमाण, द्रव्य, स्वर्ग, नरक, श्रावकधर्म, मुनिधर्म, मोक्ष व मुक्ति इत्यादि विविध विषयांचे निरुपण या ग्रंथात आहे. खरोखर 'तत्वार्थसूत्र' म्हणजे जैनसमाजाला आ. उमास्वातींच्याकडून मिळालेली अमूल्य अशी देणगी आहे.

'तत्वार्थ सूत्र' या ग्रंथावर कोणत्या आचार्यांनी कोणते टीका ग्रंथ लिहिले आहेत हे पाहिले तर या ग्रंथाचे माहात्म सहज लक्षात येते.

१. गंधहस्तिमहाभाष्य - आ. समन्तभद्र
२. सर्वार्थसिध्दि - आ. पूज्यपाद
३. राजवार्तिक - आ. अकलंकदेव
४. श्लोकवार्तिक - आ. विद्यानंदी
५. तत्वार्थटीका - आ. भास्करनंदी
६. तत्वार्थसारटीका - श्री. श्रुतसागर
७. तत्वार्थसारटीका - विबुधसेनाचार्य
८. तत्वप्रकाशिका - श्री. योगींद्रदेव
९. तत्वार्थवृत्ति - गृहस्थाचार्य योगदेव
१०. तत्वार्थटीका - गृहस्थाचार्य लक्ष्मीदेव
११. तत्वार्थटीका - श्री. अभयनंदसूरि

लेखनशैली -

प्रथमपासून जैन आगमाची रचनाशैली बौध्द पिटकाप्रमाणे लांबलचक व वर्णनात्म सूत्रामध्ये चालत आली होती. आणि तीच प्राकृत भाषेत रुढ झाली. पुढे पुढे ब्राह्मण विद्वानांनी संस्कृतमध्ये सुरु केलेली संक्षिप्त सूत्ररचना लोकप्रिय झाली. याच शैलीने आ. उमास्वामींचे मन आकर्षून घेतले. जैन साहित्य इतिहासानुसार जैन तत्वांची संस्कृत सूत्ररचना करणारे उमास्वामी आचार्य सर्वप्रथम आहेत. पुढे याच शैलीचा प्रभाव जास्त पडून दिगंबर-श्वेतांबर या दोन्ही संप्रदायातील विद्वानांनी व्याकरण, अलंकार, आचार नीति, न्याय इ. अनेक विषयांच्यावर सूत्रबध्द संस्कृत रचना केली.

'तत्वार्थसूत्र' ग्रंथातील संक्षिप्त शुध्द शैलीवरुनच उमास्वामींचे भाषेवर असलेले प्रभुत्व आपणाला दिसून येते. जैनागमातील भूगोल, खगोल, त्यांचा आकार, तसेच तत्वज्ञान, तर्कशास्त्र वगैरे अनेक गोष्टींचा उल्लेख सूत्ररुपाने तत्वार्थ सूत्रात व्यवस्थितपणे केला आहे. जैनेतर मतवाद्यांच्या मतांचे खंडन करण्यासाठी उमास्वामींनी न्या, वैशेषिक, सांख्य, योग, बौध्द इ. इतर दर्शनांचा अभ्यास केलेला दिसतो. पाणिनीच्या व्याकरणाचा अभ्यास देखील त्यांच्या तत्वार्थसूत्र ग्रंथातून प्रकट होतो. आ. उमास्वामी गद्याप्रमाणे पद्यातही सुंदर प्रकारे लिहिताना दिसतात. त्यांच्या सूत्रांची वैदिक दर्शनातील सूत्राशी तुलना करता असे आढळून येते की, जैन पंरपर श्रध्दाप्रधान आहे. तेथे शंकेला स्थान नसून संशोधन, परिवर्धन, तर्कवाद इत्यादी बाबतही परंपरा बुध्दीला खाद्य पुरविते. जैनपरंपरेने तत्वज्ञान, आचार, विचार, आहार, विहार यासाठी जितके परिश्रम घेतले आहेत, तितके परिश्रम घेतल्याचे इतरत्र क्वचित आढळते.

आ. उमास्वामींची सर्व रचना अध्यात्म तत्वांनी युक्त आहे. प्रसन्न, सरळ, संक्षिपत व शुध्द शैलीवरुनच त्यांचे भाषेवरील प्रगाढ पांडित्य चटकन मन आकर्षून घेते. खरोखर ज्ञानाची आत्यंतिक तळमळ, हतबुध्द लोकांना मार्गदर्शन करण्याची तीव्र इच्छा, त्यासाठी लागणारी प्रतिभा इ. अनेक गुण आ. उमास्वामींच्या ठिकाणी असल्याचे आढळतात. खरे पाहता आ. उमास्वामी 'तत्वार्थ सूत्र' ग्रंथाच्या रचनेद्वारे सर्व जैन समाजाला असा अमूल्य निधि देऊन गेले की, ज्यामुळे या संसारात एक शुभ्र प्रकाशाचा ज्ञान किरण सर्दव संचार करीत राहील.

**आ. समन्तभद्र**

आ. समन्तभद्रांची उत्कृष्ट कति अप्रतिहत वक्ता, निर्भयवादी धर्मशास्त्रज्ञ व तर्कज्ञानी म्हणून मोठी ख्याती आहे. जैन परंपरेतील प्रतिभाशाली आचार्य आणि समर्थ विद्वान व महान सत्पुरुषांमध्ये आ. समंतभद्रांचे स्थान फार मोठे आहे. त्यांना जैनशासनाचे प्रणेते व भावी तीर्थकर मानलेले आहे. त्यांच्या नांवाचा परिचय नसणारा असा जैन विरळाच सापडेल. श्रवणबेळगोळच्या शिलालेखात हया आचार्यांचा आपणाला 'प्रणेता जिनशासनस्य' असा उल्लेख सापडतो. अनेक जैन इतिहासकारांनी त्यांची परिपूर्ण माहिती मिळविण्याचा खूप प्रयत्न केला आहे,

अकलंक देवांनी अष्टशतीत, विद्यानंदींनी अष्टसहस्त्रीत, जिनसेनाचार्यांनी आदिपुराणात, जिनसेनसूरींनी हरिवंश पुराणात, वादिराजसूरींनी न्यायविनिश्चय विवरण व पार्श्वनाथ चरित्रात, वीरनंदीनी चंदप्रभ चरित्रात, हस्तिमल्लांनी विक्रांत कौरव नाटकात व दुसऱ्या अनेक ग्रंथकारांनी आपापल्या ग्रंथप्रारंभी आ. समन्तभद्रांचे अति आदरपूर्वक स्मरण करुन त्यांना नमस्कार केला आहे. या विविध ग्रंथात आलेल्या उल्लेखावरुनच त्यांचे महात्म सहजपणे आपल्या लक्षात येईल. प्राचीन ऋषीगणामध्ये आ. समन्तभद्रांचे स्थान फार मोठे असल्याचे दिसते.

**जन्मभूमि-पितृकुल व गुरुकुल -**

आपणाला आचार्य संमतभद्रांच्या बालपणाची गृह-जीवनाची व मातापित्यांची काहीच माहिती मिळू शकत नाही. त्यांची माहिती उपलब्ध करण्यासाठी ऐतिहासिक प्राचीन साहित्याचा आधार घेतला जातो 'आप्त मीमांसा' नामक एका प्राचीन ताडपत्रावर काही उल्लेख मिळू शकतो. त्यावरुन ते क्षत्रिय राजकुलोत्पन्न असून, त्यांचे पिता फणिफणामण्डलान्तर्गत उरगपुराचे अधिपति होते. म्हैसूर राज्यातून वहात जाणाऱ्या कावेरी नदीच्या काठी उरगपूर (त्रिचनापल्ली) ही त्यांची जन्मभूमि असावी व संवत ६० इ. स. १३८ साली आचार्यांचा जन्म झाला असावा. ते कदंब क्षत्रिय राजपुत्र असून त्यांचे जन्मकालीन नांव शांतिवर्मा व दीक्षेनंतरचे नांव समंतभद्र असे आहे. 'राजावली कथा' नांवाच्या कानडी ऐतिहासिक ग्रंथात त्यांचा जन्म 'उल्कलिका' नामक गावी झाल्याचा उल्लेख आहे. हे गाव बहुधा 'उरगपुर' विभागातच असावे.

आ. समंतभद्रांच्या पितृकुलाप्रमाणे त्यांच्या गुरुकुलाचा अथवा गुरु-शिष्य परंपरेचाही उल्लेख आपणाला मिळू शकत नाही. कोणत्याही ग्रंथाच्या प्रशस्तीमध्ये अथवा स्वतः आचार्यांच्या ग्रंथातही त्याविषयी माहिती मिळू शकत नाही.

ते मलसंघ आचार्य परंपरेतील एक प्रधान आचार्य होते. एवढाच उल्लेख मिळतो. १४ व्या शतकातील विद्वान कवी 'हस्तिमल्ल' व 'अपप्पार्य' यांनी 'श्रीमूलसंघव्योमेन्दुः' अर्थात मूसंघरुपी आकाशातील चंद्र या विशेषणाने त्यांना भूषविले आहे.

याशिवाय श्रमणबेलगोळच्य शिलालेखावरुन (नं. ६४) आपणाला पुढीलप्रमाणे शिष्य परंपरा दिसून येते, श्रीभद्रबाहु श्रुतकेवलीचे शिष्य चंद्रगुप्त, चंद्रगुप्तांचे शिष्य कोंडकुंदमुनि-कोंडकुंदाचे उमास्वाति व त्यांचे शिष्य बलाकपिच्छ असे असून याच वंशपरंपरेतील आ. समन्तभद्र होत शंका नाही. शिलालेखातील 'गुणतो गणीशः' या विशेषणावरुन ते संघाधिपति आचार्य होते.

**आचार्यांचा गुणपरिचय -**

आ. समंतभद्र जैन धर्म व जैन सिध्दांतातील अध्यात्मवादाचे मर्मज्ञ असून तर्क, व्याकरण, छंद, अलंकार, काव्य, कोष इत्यादीतही अत्यंत निष्णात होते. ते संस्कृत, प्राकृत, कानडी व तामिळी इत्यादी भाषेत पारंगत होते.विशेषतः संस्कृत भाषेवरील त्यांचे प्रभुत्व असामान्य असे होते. तामीळ ही त्यांची मातृभाषाच होती. त्यामुळे या भाषेत काही ग्रंथ लिहिले असावेत. संस्कृत साहित्याला तर त्यांचा कधीच विसर पडणार नाही.

आ. संमतभद्रांच्या वेळीच बौध्दांचा नैरात्म्यवाद, शून्यवाद, क्षणिकवाद यांचा अत्यंत प्रसार चालला होता. सर्वसाधारण जनता आपल्या तत्वापासून विचलित होऊ पहात होती. परंतु आ. समंतभद्र त्याच्याविरुध्द आजन्म झगडत राहिले. त्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. तत्कालीन बौध्द विद्वानावर आपल्या तेजस्वी व्यक्तिमत्वाने त्यांनी अशी काही छाप पाडली की, त्यांच प्रसाराल तेथेच आळा बसला. जैनधर्माला विश्वव्यापक बनविण्याचे त्यांनी महान कार्य केले. म्हणूनच की काय शुभचंद्रांनी त्यांना 'भारतभूषण' ही उपाधि बहाल केली आहे.

त्यांनी सर्व भारतभर विहार केला. अन्यमतांचे खंडन करुन जैनधर्म व अनेकांतवादाचा प्रसार केला. त्यांनी लिहिलेल्या दोन पदावरुन आपणाला ही माहिती मिळते. ते म्हणतात - 'पूर्वी मी पाटलीपुत्र नगरामध्ये वादविवादाची भेरी वाजविली. नंतर मालव, सिंधु, पंजाब, कांचीपुर इत्यादी देशात ती निनादली. हे राजन्, मी वादविवादाच्या इच्छेने सिंह वृत्ति धारण करुन विहार करीत आहे.

याशिवाय मी कांचीपुरामध्ये नग्नदिगंबर दीक्षा धारण केली आहे. मलाने माझे शरीर मलिन झाले आहे. पांडुरोगाने माझे शरीर पांढरे फट्ट पडले आहे. मी पुंड देशात शाकभिक्षु बनून नंतर दशपुर नगरात मिष्टान्नभोजी संन्यासी बनलो. माझे शरीर चंद्राप्रमाणे पांढरेफट्ट झाले आहे. असा मी तपस्वी आज तुझ्या कांची नगरीत आलो आहे. हे राजन्, ज्याच्यामध्ये शक्ति असेल अशा तुझ्या विद्वगुणापैकी कोणत्याही विद्वानाने या जैन निर्ग्रंथवादीच्या समोर वादविवाद करण्यास तयार व्हावे.'

एवढेच नव्हे तर पुनः म्हणतात- 'हे राजन् मी आचार्य, कवि, वादिराज, पंडीत, देवज्ञ, वैद्य व सिध्द या विविध स्वरुपात असून, सिध्द सारस्वत आहे. अर्थात सरस्वतीदेवी मला पूर्णतः सिध्द आहे.'

ते कवित्व, गमकत्व, वादित्व व वक्तृत्व या चारही गुणात सिध्दहस्त असून त्यांचे यश मुकुटावरील चूडामणी रत्नाप्रमाणे जणू सदैव झळाळत होते. या सर्व विविध गुणावरुन समन्तभद्र किती महान, उदात्त, प्रभावशाली व स्वाभिमानी आचार्य होते हे सहज लक्षात येईल. ते आपल्या अलौकिक गुणांनीच पूजनीय ठरले. देशदेशांतरात त्यांची कीर्ती झाली. त्यामुळे त्यांना आचार्यपदापेक्षा 'स्वामी' या पदानेच लोक अधिक प्रमाणात संबोधू लागले. ते खरोखरच ऋषी मुनींचे सद्गुणी लोकांचे 'स्वामी' होते यात संशय नाही.

जीवनकथा-

सुमारे ८०० ते ९०० वर्षापूर्वी श्रमणबेळगोळ येथील शिलालेखात समन्तभद्र आचार्यांचा संक्षिप्त उल्लेख आला आहे. तो खालीलप्रमाणे आहे -

वन्द्यो भस्मक भस्मसात् कृतिपटु पद्मावती देवता ।दत्तो दत्तपदं स्वमंत्रवचनव्याहूत चंद्रप्रभः ॥
आचार्यःस समंतभद्र गणभृत येनेह काले कलौ । जैनंवर्त्म समंतभद्रमभवत् भद्रं समन्तात् मुहुः ॥

(अर्थात- ज्यांना भस्मक रोग झाला असताना, तो ज्यांनी भस्मसात केला, पद्मावती देवतेच्या साह्याने ज्यांनी आपल्या मंत्र सामर्थ्याने शिवलिंग छेदून चंद्रप्रभ मूर्ति प्रकट केली, या कलिकालामध्ये ज्यांनी सर्वत्र कल्याणकारक जैनधर्माचा प्रसार केला त्या आचार्य समंतभद्राला नमस्कार असो.)

आचार्य समन्तभद्रांची एक जीवन कथा विस्तृतपणे पुढीलप्रमाणे मिळते-

आचार्य समंतभद्र मुनिव्रताचे निर्दोष पालन करीत असताना त्यांच्यावर पूर्वकर्मादयवश नैसर्गिक आपत्ति येऊन पडली. एकदा विहार करीत असताना मणुवकहल्ली या गावी त्यांना भस्मक रोग झ ाला. दिवसेंदिवस तो

वाढत जाऊन त्यांच्या वेदना असहय होऊ लागल्या भस्मक रोग शांत होण्यासाठी भरपुर स्निग्ध आहाराची आवश्यकता असते. संयमी जीवनात राहून रोगाची शांति होणे कठीण आहे असे जाणून त्यांनी सल्लेखनेचा विचार केला. पण त्यांच्या अलौकिक बुध्दिमत्तेवरुन त्यांच्याकडून जैनधर्माचा फार मोठा प्रचार होणार आहे, हे अल्पायुषी नाहीत हे योगज्ञानाने जाणून त्यांच्या गुरुंनी त्यांना सल्लेखनेच्या विचारापासून परावृत्त केले. काही दिवस मुनिलिंगाचा छेद करुन रोगशांति करुन घ्यावी, नतर पुनः प्रायश्चित्तादि देऊन मुनिलिंग स्वीकारावे असा उचित अपवादमार्ग सुचविला.

गुर्वाज्ञा प्रमाण मानून त्यांनी यद्यपि बहिरंगाने बाह्य जटाधारी संन्यासी वेष धारण केला. तथापि त्यांनी अंतरंगातून आपल्या रत्नत्रयव्रतास दोष लागू दिला नाही.

तो संन्यासी विहार करीत 'शिवकोटि' राजाच्या 'कांची' नगरीला आला. तेथे शिवमंदिरात दररोज सुमारे ४० शेर भाताचा नैवेद्य शिवार्पण केला जात असे. तुमचा नैवेद्य मी शिवाला अर्पण करतो, प्रत्यक्ष शिवदेवाला घ्यावयास लावतो असे सांगून मंदिराची दारे बंद करुन तो सर्व नैवेद्य स्वतः खाऊन फस्त करीत असे. कांही दिवस गेल्यानंतर जसा त्यांचा भस्मक रोग कमी होऊ लागला तसतसा तो नैवेद्य शिल्लक राहू लागला. तेव्हा राजाला शंका येऊ लागली. मंदिरात गुप्तपणे एका लहान मुलाला ठेवले. त्या संन्याशाचे सर्व बिंग बाहेर पडले. राजसेवकानी देवळाला गराडा घालून दरवाजा उघडण्यास सांगितले. हा सर्व आपणावर उपसर्ग येणार असे पाहून त्या संन्याशाने तो उपसर्ग दूर होईपर्यंत अन्न-पाण्याच्या त्यागाचा नियम करुन एकाग्र चित्ताने चोवीस तीर्थकरांची स्तुति करण्यास प्रारंभ केला. स्वयंभू स्तोत्रांची रचना केली. आदिनाथ भगवंतापासून यथाक्रम स्तुति चालू असताना जेव्हा आठव्या चंद्रप्रभ तीर्थकरांच्या स्तुतीस प्रारंभ केला, जेंव्हा त्यांची दृष्टि त्या भीमलिंग मूर्तीकडे गेली तेव्हा ती मूर्ती छिन्न होऊन त्या ठिकाणी 'चंद्रप्रभ' भगवंताची दिव्य प्रकाशमान चंद्रलांछनयुक्त स्फटिक मणीची मूर्ती प्रगट झाली. स्तुती प्रारंभ करताना त्यांनी प्रथम सात तीर्थकरांच्या स्तुतीमध्ये कोठेच वन्दे असा शब्द प्रयोग केला नाही. परंतु आठव्या तीर्थकरांच्या स्तुतीमध्ये 'वन्दे' 'मी नमस्कार करतो' असे म्हणून साष्टांग नमस्कार केला. इतक्यात राजाने व राजसेवकांन द्वार फोडून आत प्रवेश केला. आतील सर्व दृश्य पाहून राजा व सर्व लोक आश्यर्चचकित झाले. राजचे ह्रदयपरिवर्तन झाले. त्याने आपला धाकटा भाऊ शिवायन यासह योगीराज समन्तभद्र यांना नमस्कार केला. स्तुती पुर्ण झाल्यानंतर आचार्यांनी सर्वांना आशिर्वाद देऊन सत्य धर्माचे स्वरुप सांगितले. शिवकोटी राजाला वैराग्य उत्पन्न झाले. राजाने आपल्या श्रीकंठ मुलावर सर्व राज्यकारभार सोपवून आपल्या भावसह मुनिदीक्षा धारण केली. इतर लोकांनी अणुव्रते वगैरे धारण केली.

अशाप्रकारे आचार्य समन्तभद्र रोगमुक्त होऊन आपत्काल संपला असे जाणून त्यांनी गुरुजवळ प्रायश्चित पूर्वक पुनः मुनिदीक्षा धारण केली.

**ग्रंथ संपत्ती -**

आ. समन्तभद्र अनेक भाषांचे अधिकारी, ग्रंथकार व कवि होते. त्यांना लोक अनेक भाषा अवगत होत्या. तथापि संस्कृत भाषेवरील त्यांचे प्रभुत्व अगदी असामान्य होते. त्यांनी आपल्या प्रमुख अशा बऱ्याच

ग्रंथाची रचना संस्कृतमधूनच केली आहे. त्यांनी महान ग्रंथ संपत्तीची रचना केली म्हणूनच त्यांना एक महात्मा, विश्वप्रेमी, हितमितभाषी व निष्पक्ष असे म्हटले जाते. त्यांची ग्रंथसंपत्ती पुढीलप्रमाणे आहे.

१) आप्तमीमांसा (देवागमस्त्रोत्र), २) युक्त्यनुशासन, ३) स्वयंभूस्त्रोत्र, ४) जिनस्तुतिशतक, ५) रत्नकरंडक श्रावकाचार, ६) जीवसिध्दि, ७) तत्वानुशासन, ८) प्राकृत व्याकरण, ९) प्रमाणपदार्थ, १०. कर्म प्राभृत टीका, ११) गंधहस्ति महाभाष्य.

पा नं. १७२ वरुन

१. आप्तमीमांसा- हा सर्वात एक प्रमुख ग्रंथ आहे. याला 'देवागमस्त्रोत्र' असेही म्हटले जाते. यात भ. महावीर तीर्थरांची स्तुति केली आहे व ते सर्वज्ञ असून त्यांचा स्याद्वाद सिध्दांत निर्दोष आहे हे सिध्द केले आहे. या ग्रंथात एकूण ११५ श्लोक आहेत. या ग्रंथावर भट्टाकलंकदेवाने 'अष्टशती' व आ. विद्यानंदींनी 'अष्टसहस्त्री' टीका लिहिल्या आहेत. तिला 'आप्तमीमांसालंकृति' व 'देवागमालंकृति' असेही म्हटले आहे. या ग्रंथावर 'देवागम-पद्यवार्तिकालंकार' ही सुध्दा एक टीका असावी. हिचा उल्लेख 'युक्त्यनुशासन' टीकेत मिळतो. आप्तमीमांसा ग्रंथाकार कानडी, तामीळ इत्यादी भाषेतील टीका टिप्पण अथवा भाष्य देखील असावे, परंतु त्याविषयी विशेष माहिती मिळू शकत नाही.

२. युक्तनुशासन - हा दुसरा ग्रंथ असून त्यात ६४ श्लोक आहेत. यात भ. महावीर तीर्थकरांची स्तुति करुन त्यांचेच सिध्दांत युक्तियुक्त आहेत असे स्पष्ट केले आहे. आ. समन्तभद्रांचा हा ग्रंथ देखील अत्यंत महत्वपूर्ण व अपूर्व असा आहे. यात स्वमत व परमतांच्या गुणदोषांचे सुत्ररुपाने मोठे मार्मिक वर्णन केले आहे. या ग्रंथावर आ. विद्यानंदीची एक संस्कृत टीका उपलब्ध आहे.

३. स्वयंभूस्तोत्र- या ग्रंथात २४ तीर्थकरांची अत्यंत सुंदर, भावपूर्ण, काव्यमय भाषेत स्तुति केली आहे. या ग्रंथात एकूण १४३ श्लोक आहेत. तीर्थकराविषयी पौराणिक व ऐतिहासिक गोष्टींचा देखील उल्लेख केला आहे. शिवाय हा ग्रंथ तात्विक वर्णन व धार्मिक शिक्षणाने परिपूर्ण आहे. हा ग्रंथ नित्य पाठांतरासाठी सुध्दा उपयोगी आहे.

४. जिनस्तुतिशतक- हा ग्रंथ स्तुतिविद्या, जिनस्तुतिशतक, जिनस्तुतिशतं, जिनशतक, जिनशतकालंकार इत्यादी विविध नावानी संबोधिला जातो. हा ग्रंथ भक्तिरसाने ओतप्रोत भरला आहे. रचनाकौशल्य व चित्रकौशल्य यांच्या उत्कर्षांनी तो युक्त असून सर्व अलंकानांनी विभूषित आहे. हा एक कठीण ग्रंथ समजला जातो. यात एकूण ११७ श्लोक संख्या आहे. यातील श्लोक चक्र, कमल, मृदंग इत्यादी आकारांच्या चित्रात लिहिता येतात. या ग्रंथावर वसुनंदींची संस्कृत टीका आहे.

५. रत्नकरंडकश्रावकाचार- याला रत्नकरंडक उपासकाध्ययन श्रावकाचार अथवा समीचीन धर्मशास्त्र असेही म्हणतात. यात एकूण १५० श्लोक आहेत. या ग्रंथात सम्यग्दर्शन, ज्ञान आणि चरित्र, यांचे संक्षिप्त वर्णन करुन श्रावक धर्माचे वर्णन विस्ताराने केले आहे. या ग्रंथावर आचार्य प्रभाचंद्राची टीका असून, त्याने प्रस्तुत ग्रंथाचे सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र याचें वर्णन करुन अणुव्रते, तीन गुणव्रते, चार शिक्षाव्रते, समाधिमरणाचे वर्णन व श्रावकांच्या अकरा प्रतिमांचे वर्णन केले आहे. पं. सदासुखजींनी यावर विस्तृत हिन्दी टीका लिहिली आहे आणि याच टीकेच्या अनुवाद श्री. जीवराजजी गौतमचंद दोशी यांनी मराठीत केला आहे. खरोखर १००-१५० श्लोकरुपी फुले गुंफून भाविकांची इच्छा पुलकित करण्यासाठी हा जणु सुंदर हारच तयार करुन ठेवला आहे.

६. जीवसिध्दी- या ग्रंथाचा उल्लेख आपणास श्रीजिनसेनाचार्यप्रणीत 'हरिवंशपुराणात' मिळतो
जीवसिध्दिविधायीह कृतयुक्त्यनुशासनम् । वचः समन्तभद्रस्य वीरसेव विजृम्भते ॥

जीवाच्या सिध्दीविषयी या ग्रंथात विवेचन असून त्यात अत्यंत उपयोगी विषयांची चर्चा केली आहे. हा ग्रंथ भ. महावीरांच्या वचनाप्रमाणे मानला जातो. यावरुन तो ग्रंथ अत्यंत महत्वपूर्ण असल्याचेही लक्षात येते. दुर्भाग्यामुळे हा ग्रंथ अद्याप उपलब्ध नाही. याच्या शोधाची नितांत आवश्यकता आहे.

७. तत्वानुशासन- 'जैनग्रंथावली' अनुसार हा ग्रंथ समंतभद्रांनीच लिहिला असावा. परंतु अद्याप या ग्रंथाच्या लेखकाविषयी निश्चित माहिती मिळत नाही, पद्मप्रभ मलधारिदेव रचित नियमसारवरील टीकेत 'तथा चोक्तं तत्वानुशासने' असा उल्लेख मिळतो. 'तत्वानुशासन' हा ग्रंथ पद्यमय असावा.

पानं नं. १७३ वरुन

८. प्राकृतव्याकरण- 'जैनग्रंथावली' नुसार समंतभद्रांचे एक प्राकृत व्याकरण देखील असावे. याची संख्या १२०० श्लोक इतकी असावी. या ग्रंथाचा उल्लेख 'रॉयल एशियाटिक सोसायटी' च्या आधारे केला आहे. परंतु अद्याप हा ग्रंथ उपलब्ध असल्याचे दिसत नाही. तो उपलब्ध असेल तर जैनांच्या दृष्टीने ती एक मोठी गौरवाचीच गोष्ट आहे. श्रीपूज्यपाद आचार्यांनी 'जैनेद्र व्याकरण' या ग्रंथात 'चतुष्टयं समंतभद्रस्य' या सूत्राने समंतभद्रांचा उल्लेख केला आहे. यावरुन त्यांचे एखादे व्याकरण उपलब्ध असणे स्वाभाविक आहे.

९. प्रमाणपदार्थ- हा संस्कृत भाषेतील ग्रंथ असून यात एकूण १००० इतके श्लोक असावेत. हा ग्रंथ अपुरा असल्याचाही उल्लेख केला गेला आहे. हा ग्रंथ न्यायविषयक असल्यामुळे त्याला विशेष प्रकारचे महत्व आहे. त्याची काही पाने नष्ट झाली आहेत. हा ग्रंथ हाती आल्याशिवाय त्याविषयी विशेष सांगणे योग्य ठरणार नाही.

१०. कर्मप्राभृत-टीका- याला 'कर्मप्रकृतिप्राभृत' असे सुध्दा म्हटले जाते. हा एक सिध्दान्त ग्रंथ आहे. 'षट्खंडागम' मधील पहिल्या पाच अध्यायावर ही टीका समंतभद्रांनी लिहीली आहे. हा ग्रंथ मृदू संस्कृत भाषेत लिहिला असून या ग्रंथाची श्लोकसंख्या ३८००० इतकी असावी. याशिवाय असे समजते की, या टीकेशिवाय समन्तभद्र कषायप्राभृत नावाची द्वितीय लिहित होते परंतु अन्य साधूंनी त्यांना ती लिहिण्यास मनाई केली.

११. गंधहस्तिमहाभाष्य- आ. समन्तभद्रांनी तत्वार्थसूत्रावर गंधहस्तिमहाभाष्य हा ८४००० श्लोकांचा टीकाग्रंथ लिहिला होता असे वर्णन चामुंडराय, गुणवर्मा, धर्मभूषण इत्यादी लेखकांनी केले आहे. अर्थात 'गंधहस्ति' हे विशेषण जैनपरंपरेत प्रसिध्द असून दिगंबर परंपरेत ते विद्वान समंतभद्रांना व श्वेतांबर परंपरेत ते विद्वान सिध्दसेनाला दिले जाते. गंधहस्तिमहाभाष्याविषयी विशेष उल्लेख आपणला मिळत नाही. तरी सुध्दा असे महान भाष्य आ. समंतभद्रांच्याशिवाय कोण लिहिणार ?

पंडित जुगलकिशोर यांनी अनेक मासिकात म्हटले आहे की, 'धवला टीकेत आपणाला गंधहस्तिमहाभाष्याचा उल्लेख मिळतो' धवलाची प्रामाणिकता अप्रामाणिकता याविषयी अभ्यास करणारे डॉ. हिरालाल जैन यांच्या मते गंधहस्ति टीकेचा उल्लेख धवलामध्ये सापडत नाही.

वर उल्लेखिलेले आ. समंतभद्रांचे सर्व ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. त्यातील आतापर्यंत स्वयंभूस्तोत्र, युक्त्यनुशासन, स्तुतिविद्या, आप्तमीमांसा, रत्नकरंडक श्रावकाचार इ. ग्रंथ उपलब्ध असून इतर ग्रंथाच्या उपलब्धतेची नितांत आवश्यकता आहे.

**भाषाशैली -**

आ. समंतभद्रांची भाषाशैली काही काही ठिकाणी अत्यंत साधी, सोपी, सरळ आहे तर काही ठिकाणी ती अत्यंत दुर्गम अशी आहे. आ. समंतभद्रांच्या सर्व ग्रंथरचनेचे अवलोकन केले तर आचार्यांचे संस्कृत भाषेवर अत्यंत मोठे प्रभुत्व होते हे सहजसिध्द होते. त्यांची मातृभाषा तामिळी असून कानडी भाषेत देखील त्यांनी ग्रंथरचना केली असावी यात शंका नाही. आपल्या प्रभुत्वाची छाप अन्य मतवाद्यांवर टाकण्याची त्यांची पध्दती काही वेगळीच होती. ते शीघ्र कवी होते.

आ. समंतभद्र किती चतुर, स्पष्ट व शीघ्र कवी होते, त्यांनी वक्ता धूर्जटीची जिव्हा देखील कशी बंद केली होती हे अजिसेनाचार्यांच्या 'अलंकारचिंतामणि' व हस्तीमल कवीच्या 'विक्रांतकौरव' नाटकाच्या प्रशस्तीमध्ये दिलेल्या श्लोकावरुन दिसून येईल. तो श्लोक पुढीलप्रमाणे-

अवटुतमटति झटिति स्फुटपटुवाचाटधूर्जटेर्जिव्हा । वादिनि समन्तभद्रे स्थितवति सति का कथन्येयाम् ॥

अर्थात धूर्जटिसारखा विद्वान व वक्ता समंतभद्र आचार्यांच्या पुढे टिकला नाही तर इतर विद्वानांची काय कथा ?

आ. समंतभद्रांनी सर्वात मुख्य म्हणजे, परमताचे खंडन व स्वमताचे प्रतिपादन फार चांगल्याप्रकारे केले आहे. स्याद्वाद तथा अनेकांतवादाचा डंका तर त्यांनी सर्व भारतभर पसरविलेला आहेच, याशिवाय आपल्या ग्रंथातून त्यावर विशेष भर दिला आहे. 'रत्नकरंडक श्रावकाचार' सारखे ग्रंथ तर अत्यंत सुलभ व नित्य पठनासाठी योग्य असे लिहिले आहेत. विविध विद्वानांच्या ग्रंथातील प्रशस्तीतील त्यांचा झालेला उल्लेखच त्यांची महति सांगतो.

आ. समंतभद्रांच्यात शुध्द, सुलभ भाषासरणी, तर्कशुध्द मांडणी व थोडक्यात आपले विचार मांडण्याचे अजब पांडित्य आणि कला यांचा त्याच गंथात सुंदर मिलाफ झाला आहे. ते महान योगी, तपस्वी व तर्कज्ञानी होते. त्यांनी छंद, अलंकार, काव्य यांचा दांडगा अभ्यास केला होता. ब्रह्म अजित कवीने 'हनुमच्चरित्र' काव्यात समंतभद्रांना 'भव्यरुपी कमळांना प्रफुलित करणार चंद्रमा' असे म्हटले आहे.

थोडक्यात आचार्य समन्तभद्र हे महान ग्रंथकार, विद्वान पंडीत, प्रतिभासंपन्न कवि, स्याद्वादसिध्दांन्तपति, महान तत्ववेता, अस्खलित वक्ता, आजन्म ब्रह्मचारी व विजेतावादी होते हे स्पष्ट होते. स्वत: महान ग्रंथरचना करुन तर त्यांनी जैनधर्मावर महान उपकार केले आहेत. ते कदापि विसरता येणार नाहीत.

**आचार्य पूज्यपाद**

पूज्यपादः सदा पूज्यपादः पूज्यैः पुनातु माम् ।व्याकरणार्णवो येन तीर्णो विस्तीर्णसद्गुण ॥

शुभचंद्र भट्टारक यांनी पांडव पुराणात उधृत केलेल्या श्लोकावरुनच आचार्य पूज्यपादांची महती सहजपणे आपल्या लक्षात येते. अर्थात 'पूज्यपाद हे पूज्यांनासुध्दा पूज्यपाद-वंदनीय आहेत. ते मला पावन करोत ! ते अनंत सद्गुणांचे धारक असून, व्याकरणशास्त्ररुपी समुद्र त्यांनी ओलांडिला आहे.' एवढेच नव्हे तर श्री पूज्यपाद आचार्यांची, त्यांच्या अद्वितीय ग्रंथाची, त्यांच्या अपार विद्वत्तेची व त्यांच्या पावित्र्यपूर्ण चारित्र्याची प्रशंसा भगवान जिनसेनाचार्यांनी आदिपुराणत, वादिराजाने पार्श्वनाथ चरित्रात, पद्मप्रभानी नियमसार टीकेत व शुभचंद्रांनी ज्ञानार्णवात केली असून आचार्यांना भक्तिपुरस्सर स्तुतिसुमने वाहिली आहेत.

आचार्य पूज्यपाद एक प्रभावशाली विद्वान व युगप्रधान प्रकांड पंडीत होते. आचार्य पूज्यपादांना देवनन्दी, जिनेंद्रबुध्दि, पूज्यपाद व संक्षिप्त 'देव' या विविध नावांनी संबोधिले जाते. त्यांनी सर्वार्थसिध्दि, जैनेंद व्याकरण इ. महान ग्रंथाच्या रचनेबरोबरच इष्टोपदेश, समाधितंत्रासारख्या अध्यात्मिक ग्रंथांचीही रचना केली. त्यांचे 'जैनेंद व्याकरण' तर सुप्रसिध्दच आहे. तत्कालीन विद्वानांनी आ. पूज्यपादांचा 'यंत्रमंत्रादि शास्त्रोक्तकरम्', 'विश्वविद्याभरणां', 'शालाक्यं पुज्यपादप्रकटहितमधिकं' व 'षडदर्शनरहस्य-सवेदन-सम्पादित निस्सीम पांडित्य-मण्डिताः' इ. विशेषणांनी गौरविले आहे. यावरुन आ. पूज्यपाद हे फार मोठे तार्किक, गाढे विद्वान एवढेच नव्हे तर न्यायशास्त्रकार व वैद्यशास्त्रकारही असावेत हे सिध्द होते. जैनेंद्र व्याकराणातील सूत्रांच्या लघुत्वामुळे भारतातील आठ प्रमुख शाब्दिकामध्ये पूज्यपाद यांचीही गणना आहे.

**आ. पूज्यपादांचे चरित्र-**

पूर्वीच्या आचार्यांनी तथा मोठमोठया पंडित व विद्वानांनी प्रसिध्दि पराडमुख राहाण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. स्वतःच्या ग्रंथातून अथवा अन्यत्र माहिती देण्याविषयी बऱ्याच जणांनी मौन बाळगलेले दिसते. आ. पूज्यपाद हे देखील त्याला अपवाद नाहीत. अर्थात् अशावेळी ह्या महान् विद्वानांची माहिती गोळा करण्याकरिता आपणाला तत्कालीन साहित्य, शिलालेख, अथवा समकालीन विद्वान इ. बाबींचा विचार करावा लागतो.

आचार्य पूज्यपाद यांची माहिती अशाच एका श्रवणबेळगोळमधील शिलालेख नं. ४० मधून मिळते. या शिलालेखात त्यांची देवनन्दि, जिनेंद्रबुध्दि व पूज्यपाद ही नावे दिली आहेत. देवनन्दि याचा संक्षेप करुन 'देव' संबोधिले आहे.

आ. पूज्यपादांचा जन्म कर्नाटकात 'कोळगाव' नावाच्या गावात श्रवण नक्षत्रावर झाला. त्यांच्या पित्याचे नाव माधवभट्ट असून मातेचे नाव श्रीदेवी होते. यांनी जैनशास्त्रात अतिशय प्रावीण्य संपादन केले आणि अल्पवयातच जिनदीक्षा घेतली. शास्त्रातील प्रावीण्यामुळे व त्यांच्या तपश्चरणाच्या पुण्यप्रभावामुळे त्यांचे 'जिनेंद्रबुध्दि' हे नाव पडले. देवता त्यांचे चरण पूज्य मानू लागल्या म्हणून त्यांचे नाव 'पूज्यपाद' पडले. आचार्यांचे दुसरे नांव 'देवनन्दि' आहे. यावरुन ते मूलसंघातील कुंदकुंदन्वयामध्ये नंदिसंघाचे प्रमुख आचार्य होत. त्यांचा जीवनकाल सुमारे इसवी सनाच्या ५ व्या शतकात असावा असे इतिहासतज्ञांचे मत आहे.

वरील चरित्रविषयक माहिती शिवाय कानडी भाषेत चंद्रय्य कवीने 'पूज्यपादचरित' नावाच्या ग्रंथात आ. पूज्यपादांची माहिती दिली आहे. कर्नाटकात कोले गावात ब्राह्मणकुलोत्पन्न माधवभट्ट व श्रीदेवी यांच्या पोटी पूज्यपादाचा जन्म झाला. हा पुत्र त्रिलोकपूज्य होईल असे भविष्यकारांच्या सांगण्यावरुन त्यांचे नाव 'पूज्यपाद' ठेवण्यात आले. पत्नीच्या सांगण्यावरुन माधवभट्टाने जैनधर्माच स्वीकार केला. माधवभट्टाच्या मेहुण्याचे नाव 'पाणिनि' असे होते. त्यालाही जैनधर्माच स्वीाकर करण्याविषयी माधवभट्टाने आग्रह केला. परंतु त्यांचे ते म्हणणे न ऐकता पाणिनीने 'मुडीगुंड' गावी वैष्णवपंथी संन्यास धर्माची दीक्षा घेतली. पूज्यपादांना कमलिनी नावाची एक धाकटी बहीण होती. तिचे गुणभट्टाशी लग्न झाले व गुणभट्टापासून तिला नागार्जुन नावाचा एक मुलगा झाला.

"एकदा नागार्जुनाने वनस्पतीच्या मदतीने सोने बनविण्याची क्रिया हस्तगत केली होती परंतु त्याचा गर्व परिहार करण्यासाठी एका सामान्य वनस्पतीपासून पूज्यपादांनी सिध्दरस बनवून दाखविला."

आ. पूज्यपाद आपल्या पायास गगनगामी औषधीचा लेप लावून विदेह क्षेत्राची यात्रा करीत. त्याचवेळी त्यांचा शिष्य वज्रनंदी याने आपल्या सहकारी साधूबरोबर भांडण करुन इ. स. ४७० मध्ये 'द्राविड' संघाची स्थापना केली. पूज्यपादांचा योगाभ्यास दांडगा होता. एकदा देवविमानात बसून तीर्थांची यात्रा करीत असताना, त्यांना अंधत्व आले. त्यावेळी 'शांत्यष्टक' स्तोत्र रचून त्यांनी आपली गमावलेली दृष्टी परत मिळविली व आपल्या गावी शांत चित्ताने समाधिपूर्वक देह ठेवला. याविषयीचा उल्लेख आपणाला दशभक्तित देखील मिळतो.

वरील चरित्रविषयक चंद्रय्यकवीने दिलेल्या पूज्यपादांच्या चरित्रातील काही भाग अतिशयोक्तिपूर्ण वाटत असला तरी, त्यातील काही भाग ऐतिहासिक आहे यात शंका नाही.

आ. पूज्यपाद हे दिगंबर जैन मूलसंघाचे प्रमुख आचार्य होते. कुंदकुंदाच्या परंपरेत जे प्रमुख उमास्वामी, बलाकपिच्छ, समन्तभद्र हे आचार्य होऊन गेले. त्यांच्यानंतर लगेच देवनंदी उर्फ आ. पूज्यपाद यांचा क्रमांक येतो.

चंद्रय्य कवीने कानडी भाषेत लिहिलेल्या 'पूज्यपादचरित' ग्रंथात वज्रनंदी हा पूज्यपादांचा शिष्य होता व त्याने इ. स. ४७० मध्ये द्राविड संघाची स्थापना केली, याचा उल्लेख आला आहे. याशिवाय गंगराजा अविनीत व त्याचा मुलगा दुर्विनीत हे तर पूज्यपादांना आपले शिक्षागुरु मानीत होते.

वरील वज्रनंदी, अविनीत व दुर्विनीत या तीन शिष्याशिवाय विजयनगरचा राजा हरिहर याच्यावेळी एक मंगराज नावाचा कानडी कवि होऊन गेला. त्याचा अस्तित्व काल विक्रम संवत १४१६ च्या दरम्यान असावा. त्याने विष प्रक्रिया व चिकित्सा यावर 'खगेन्द्र मणिदर्पण' नावाचा ग्रंथ लिहिला. तो मंगराज कवि स्वतःला आ. पूज्यपादांचा परंपरेने शिष्य मानतो व आपल्या ग्रंथातून त्यांचा उल्लेख करण्यास विसरत नाही.

**आ. पूज्यपादांचा काल-**

आचार्य पूज्यपादांचा काल निश्चित ठरविणे कठीण आहे. तरीसुध्दा त्यांची कालविषयक चर्चा हेब्बूर ताम्रपट, एपिग्राफिआ कर्नाटिका, देवसेनार्चांचा दर्शनसार इत्यादी ग्रंथातून मिळते.

स्वत: पूज्यपाद अर्थात देवनन्दिने जैनेन्द्र व्याकरणात दोन सूत्रामध्ये प्रसिध्द आचार्य सिध्दसेन (वेत्तेः सिध्दसेनस्य) आणि समन्तभद्र (चतुष्टयं समन्तभद्रस्य) यांचा उल्लेख केला आहे. अर्थातच सिध्दसेन व

समन्तभद्र हे दोन्ही आचार्य पूज्यपादांचा पूर्वी होऊन गेले असावेत. तसे पाहता सिध्दसेन दिवाकरांचा देखील निश्चितपणे काल निर्णय मिळू शकत नाही. परंतु पूर्वश्रुतीनुसार सिध्दसेनांना विक्रमादित्याच्या समकालीन मानले जाते. विक्रमादित्याच्या नवरत्न मंडळ यादीमध्ये बहुधा सिध्दसेन दिवाकरांचेच नाव असल्याचे मानले जाते. श्री. राइस यांनी सिध्दसेनाचा काल ५ व्या शतकाच्या समकालतेचा आधार बरोबर असला तर सिध्दसेन चौथ्या शतकाच्या शेवटी होऊन गेले हे म्हणणे उचित ठरेल. आ. समन्तभद्रांचा देखील हाच काल असावा. या दोन्ही आचार्यानंतर आ. पूज्यपादांच्या कालाची गणना करणे अगदीच उचित ठरेल.

**ग्रंथसंपत्ती -**

आ. पूज्यपादांनी जे ज्ञानार्जन केले अथवा बुध्दिबलाने आकलन केले ते शब्दसाधनेद्वारे एकत्रित करुन ग्रंथरुपाने प्रकट केले. पूज्यपादांनी मोठया प्रमाणात साहित्य निर्मिती केली. त्याचे बरेचसे साहित्य अनुपलब्ध आहे. सध्या उपलब्ध असलेले त्यांचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत-

१) जैनेन्द्र व्याकरण, २) सर्वार्थसिध्दी, ३) समाधिशतक अथवा समाधितंत्र, ४) इष्टोपदेश, ५) संस्कृत दशभक्ति, ६) सिध्दिप्रिय स्तोत्र.

या ग्रंथाच्या शिवाय त्यांनी सारसंग्रह, षट्दर्शन रहस्य, जैनाभिषेक, अर्हतप्रतिष्ठालक्षण, शांत्यष्टक कल्याणकारक वैद्यकग्रंथ वगैरे ग्रंथाची निर्मिती केली असावी. या महान ग्रंथसंपत्तीवरुन असे दिसून येते की, आ. पूज्यपाद केवळ उच्च दर्जाचे संयमी अथवा विद्वान नसून त्यांना व्याकरण, न्याय, सिध्दांत, वैद्यक, छंदशास्त्र,ज्योतिष यांचे फक्त ज्ञान नसून त्यावर त्यांचा पूर्ण अधिकार होता. खरोखर आ. पूज्यपाद आध्यात्मिक साहित्याची निर्मिती करणारे, निस्पृही, निर्ग्रंथ, साहित्यिक व महान पुरुष होते.

१. जैनन्द्र व्याकरण- नावावरुनच हा ग्रंथ व्याकरणशास्त्राविषयी असावा हे स्पष्ट होते. 'बोपदेव' नावाच्या महान व्याकरणकाराने आपल्य 'मुग्धबोध' नावाच्या ग्रंथात आठ महाव्याकरण ग्रंथात जैनेंद्र व्याकरण ग्रंथाचा उल्लेख केला आहे. धनंजय कवीने 'नाममालेत' पूज्यपादांच्या व्याकरण शास्त्राला अपूर्व रत्न म्हणून संबोधिले आहे तर गुणनन्दीने जैनेंद्र व्याकरण सर्वांगपरिपूर्ण सर्वांगसुंदर असल्याची घोषणा केली आहे आणि वर्धमान कवीनी पूज्यपादांच्या व्याकरण ग्रंथाचे व त्यांचे आदरपूर्वक नामस्मरण केले आहे.

भारतीय व्याकरण शास्त्रात जैनेंद्र व्याकरणाचे प्रमुख स्थान आहे. जैन साहित्यात तर याची खूपच महती आहे. अन्य व्याकरणकारांनी शाकटायन आणि पाणिनीसारख्या अतिप्राचीन व सुविख्यात व्याकरणकारांच्या बरोबर जैनेंद्र व्याकरणाचाही उल्लेख केला आहे. आ. पूज्यपादांनी जैनेंद्र व्याकरण लिहीत असताना, पाणिनीच्या सूत्रांचा खूपच आधार घेतला आहे. जैनेंद्र व्याकरणातील सूत्रपाठांच्या दोन परंपरा सांगितल्या आहेत. त्यातील पहिल्यात तीन सहस्त्र सूत्रें असून दुसरीत जवळजवळ ७०० सुत्रे अधिक आहेत. श्री प्रेमीजींच्य मतानुसार मूल जैनेन्द्राची सूत्रसंख्या तीन सहस्त्रच असावी. यावर अभयनंदीची टीका उपलब्ध आहे ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने या ग्रंथाला विशे्ष महत्व दिले जाते. व्याकरणशास्त्रातील हा एक महान ग्रंथ आहे, यात काहींच शंका नाही

जैनेंद्र व्याकरणावर आतापर्यंत चार टीका उपलब्ध असल्याच्या दिसतात. १) अभयनन्दिकृत 'महावृत्ति' २) प्रभाचन्द्रकृत 'शब्दाम्भोजभास्करन्यास', ३) श्रुतकीर्तिकृत 'पंचवस्तुप्रक्रिया' आणि ४) पं. महाचंद्रकृत 'लघुजैनेंद्र' याशिवाय या ग्रंथावर इतरही काही टीका असाव्यात असे वाटते. पंचवस्तूच्या शेवटच्या श्लोकात जैनेंद्र व्याकरणाला महालाची उपमा दिली आहे. हा महाल मूळ सूत्ररुपी स्तंभाच्या वर उभा असून, न्यासरुप ही त्याची रत्नमय भूमी आहे, वृत्तीरुप त्याची द्वारे आहेत, भाष्यरुप शय्यातल आहे, टीकारुपी साहित्य त्यात भरले असून पंचवस्तु टीका ही त्या महालाची सोपानश्रेणी आहे. यावरुन पंचवस्तुकर्ता श्रुतकीर्तीच्या वेळी या जैनेंद्र व्याकरणावर न्यास, वृत्ति, भाष्य व काही टीका ग्रंथ उपलब्ध असावेत.

२) सर्वार्थसिध्दि - ही आ. उमास्वामींच्या तत्त्वार्थसूत्र ग्रंथावर लिहिलेली टीका आहे. सूत्रांचा अर्थ विस्तृतपणे सांगणारा हा एक महान ग्रंथ आहे. केवळ सांप्रदायिक भिन्नतेमुळे या ग्रंथाचे भाष्य आणि सर्वार्थसिध्दि असे दोन भाग मानले आहेत. श्वेतांबर सांप्रदायाने या टीकेला भाष्य मानले आहे तर, दिग्ंबर सांप्रदायाने या टीकेला सर्वार्थसिध्दि असे म्हटले आहे. दोन्ही परंपरेनुसार या

ग्रंथातील सूत्रसंख्या, अर्थभेद, पाठांतरभेद व त्यातील यथार्थता अथवा योग्यता याबाबत फरक मानला आहे. दोन्ही परंपरेनुसार अनुक्रमे ३४४ व ३५७ ही त्यातील सूत्रसंख्या मानली आहे.

भाषाशैलीच्या दृष्टीने सर्वार्थसिध्दि टीका विकसित असल्याचे दिसते. जैनेतर दर्शनांची देखील चर्चा सर्वार्थसिध्दीत केली आहे. स्वपक्ष मतमंडन व परमत खंडन हे अगदी सुदंररीत्या केले आहे. या टीकेला तार्किकतेची सुंदर बैठक आहे. राजवार्तिक, श्लोकवार्तिक या तत्वार्थसूत्रावरील इतर टीकांनी देखील सर्वार्थसिध्दि टीकेचाच पुष्कळसा आधार घेतला आहे. तत्वार्थसूत्रावरील सर्वार्थसिध्दि ही पूज्यपादांची एक सर्वांगीण विकसित अशी महान टीका असल्याचे समजले जाते.

३) इष्टोपदेश- आ. पूज्यपादांचा हा सर्वात छोटा आणि महत्वपूर्ण सुंदर असा ग्रंथ आहे. याला जर जैनोपनिषद म्हटले तरी अतिशयोक्ति होणार नाही. या ग्रंथात मानवकल्याणकारी तत्वांचे अत्यंत सुंदर व हृदयबोधक वर्णन केले आहे. यात व्रतादींची सार्थकता, स्वर्गसुखाचे व आत्मस्वरुपाचे वर्णन अत्यंत सुंदर प्रकारे

इष्टोपदेश ग्रंथावर पं. आशाधरजीकृत संस्कृत टीक ा, जैनन्यायदर्शनाचार्य धनयकुमारजीकृत हिन्दी टीका, बैरिस्टर चम्पतरायजीकृत इंग्रजी टीका लिहिल्या गेल्या असून, या ग्रंथाचा मराठी, गुजराती व हिन्दी पद्यानुवाददेखील झाला आहे.

४) दशभक्ति- "संस्कृताः सर्वा भक्तयः पूज्यपादास्वामिकृताः" या प्रभाचंद्राचार्यांच्या कथनावरुन हा ग्रंथ आ. पूज्यपादांनी लिहिला असावा.

५) सिध्दिप्रियस्तोत्र- हा आचार्यांचा शेवटचा ग्रंथ असावा. त्यात तो स्तोत्ररुपाने लिहिला असून या ग्रंथात २४ तीर्थकरांची स्तुति केली आहे. या कृतीत यमकालंकाराचा अवलंब केलेला दिसतो.

आ. पूज्यपाद व समाधिशतक

जैन परंपरेप्रमाणे आ. पूज्यपादांचा समाधिशतक अथवा समाधितंत्र हा ग्रंथ अत्यंत मौल्यवान मानला जातो. म्हणूनच या ठिकाणी या ग्रंथाचे थोडे विस्तृत स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

समाधिशतक हा ग्रंथ १०० श्लोकांनी युक्त एक आध्यात्मिक ग्रंथ आहे. यात अध्यात्म विषयाचे विवेचन आचार्यांनी मोठया कुशलतेने व तार्किकपणे केले आहे. द्रव्यानुयोगातील हा एक उत्कृष्ट ग्रंथ समजला जातो. या ग्रंथावर आचार्य प्रभाचंद्रांनी संस्कृत टीका लिहिली आहे. भव्यजीवांना मोक्षमार्ग दाखविणारा हा ग्रंथ असून, त्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत.

समाधिशतक हा पूज्यपादांचा शेवटच ग्रंथ असावा. पूज्यपादांची बाहय विषयावरील प्रवृत्ति नष्ट होऊन अंतर्मुख वृत्ति झाल्यानंतर ते जेव्हा स्थितप्रज्ञ अवस्थेला पोहोचले त्यावेळी या ग्रंथाची रचना झाली असावी. जैनवाडमयात आध्यात्मविषयावर अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. परंतु या ग्रंथाचे स्थान त्या सर्व ग्रंथात अप्रतिम असे आहे.

या ग्रंथाविषयी पद्मश्री पं. सुमतिबाई शहा लिहितात- 'आध्यात्म ग्रंथाविषयी मी जेव्हा विचार करते त्यावेळी माझे लक्ष आ. पूज्यपादचरित समाधिशतकाकडे अधिक प्रकर्षाने आकर्षित होते. या ग्रंथाने जणुं जनसाधारणासाठी सरल तसेच हृदयग्राहिणी शैलीद्वारे आत्मरसाची सरिताच प्रवाहित केली आहे. खरोखर हा महान ग्रंथ म्हणजे अध्यात्म प्रेमीजनाना एक नवीन व दिव्य दृष्टि उपलब्ध करुन देणार महान उपयोगी ग्रंथ आहे.'

समाधिशतक या ग्रंथात पूज्यपादाचार्यांनी "आत्मा म्हणजे काय, त्याचे प्रकार किती, आपण कोण आहोत, काय करतो, काय करावे, काय व्हावे, कशाचा उपयोग करावा, कशाविषयी प्रेम बाळगावे, कशावर भक्ति करावी, कोणत्या वस्तूंचा त्याग करावा, सांसारिक जीवाला शांततेच्या वातावरणात कसे राहता येईल, तसेच मानवी जीवितांचे अंतिम ध्येय काय आहे व मोक्षप्राप्तीचे तंत्र काय आहे, इत्यादि विषयांचे विवेचन फार स्पष्ट व सुलभ रीतीने केले आहे."

'परमात्म्याच्या यथार्थ स्वरुपाचे ज्ञान' करुन घेणे हा समाधिशतकातील सर्वात प्रमुख विषय मानला जातो. पूज्यपादांनी प्रस्तुत विषय आगम, युक्ति, व अंतःकरणाची एकाग्रता करुन व्यवस्थितरीत्या सांगितला आहे. परमात्म्याचे किंवा शुध्दात्म्याचे ज्ञान होण्यासाठी अशुध्द आत्मज्ञानाची माहिति असणे अत्यावश्यक आहे.

त्यासाठी आत्म्याचे बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्मा असे तीन प्रकार मानून, त्यांचे स्वरुप या ग्रंथात समजावून दिले आहे. त्यापैकी परमात्मा उपादेय साध्य किंवा आराध्य असा आहे. अन्तरात्मा उपायरुप, साधक किंवा आराधक असल्याची कल्पना केली आहे आणि बहिरात्मा हेयरुप किंवा त्याज्य आहे असे ठरविले आहे. या तीन आत्मभेदांचे योग्य ज्ञान झाले म्हणजे देहादिकांचे ठिकाणी आत्मस्वरुपाची जी भ्रांति चाललेली असते, तिचा पूर्णपणे निरास होऊन परमनिर्मल अशा परमात्म स्वरुपाचे ज्ञान होते. हे ज्ञान यथायोग्य झाले म्हणजे रागद्वेषादि व चित्तदोषांचा नाश होतो, चित्तविक्षेप नाहीसा होतो, आणि शत्रुमित्राविषयी मध्यस्थबुध्दि किंवा उदासीनबुध्दी उत्पन्न होऊन, चित्त प्रसन्न होते. हीच अति उच्च प्रतीची 'समाधि' होय पण ही अवस्था प्राप्त होण्यासाठी ज्या ज्ञानाची आवश्यकता असते त्यासाठी कायक्लेशादि उपायांची आवश्यकता असते. कायक्लेशादि शिवाय अति सुकुमार उपायांनी जे ज्ञान प्राप्त होते ते फार काळ टिकत नाही. म्हणून शुभ हिताची इच्छा असणाऱ्या योग्यांनी कष्ट सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे व आत्मस्वरुपाचे यथार्थ चिंतन केले पाहिजे.

खरी सुखशांति कशी प्राप्त होते याचेही सुंदर विवेचन आचार्यांनी केले आहे. जोपर्यंत हा जीव जगाच्या व्यापात गुंतून राहतो तोपर्यंत त्याच्या मनाची स्थिरता राहू शकत नाही. त्याची चंचल मनोवृत्ति सारखी धाव घेत राहते. जोपर्यंत मनाची ही चंचलवृत्ति जात नाही, चित्ताला स्थिरता प्राप्त होत नाही तोपर्यंत या जीवाला खरी सुखशांति प्राप्त होत नाही. खऱ्या सुखशांतीसाठी संत पुरुष जगरुपी जालाच्या व्यापातून मुक्त होऊन सर्वसंग परित्यग करुन उत्तमसमाधि, मनाची स्थिरता व एकाग्रता प्राप्त करुन घेण्यासाठी निसर्गाचा अथवा वनाचा आधार घेतात. समाधी हेच मुक्तिचे साधन आहे हे सांगताना आचार्य म्हणतात-

मुक्तिरैकान्तिकी तस्य चिते यस्याचला धृतिः ।
तस्य नैकान्तिकी मुक्तिर्यस्य नास्त्यचला धृतिः ॥

(ज्याच्या अंतःकरणात अविचन धृति-स्थिरता आहे त्याला एकांतपणे (सर्वथा) निश्चयाने मुक्ति अवश्य प्राप्त होते. ज्याच्या अंतःकरणात स्थिरता नाही, ज्योच अंतःकरण सारखे इकडे तिकडे धाव घेते, जगाच्या व्यापात गुंतून राहते, त्याला सर्वथा मुक्तिची प्राप्ति होत नाही.)

मात्र ज्याप्रमाणे कमल पाण्यात राहूनही पाण्याच्या संसर्गापासून सद अलिप्त, शुध्द निर्लेप असते त्याप्रमाणे हा जीव जगात राहून देखील जगाच्या व्यापापासून-संसर्गापासून सदा सर्वदा अलिप्त राहतो व सर्वांगसुंदर आत्ममंदिरामध्ये अविचल स्थिर होऊन कालाच्या अंतापर्यंत शांतिसुखाचा आस्वाद घेत राहतो.

ग्रंथ समारोप करताना आचार्य म्हणतात 'परमात्मपद वचनातीत आहे. इंद्रियगम्य नाही. वचनाने कथन करण्यायोग्य ते नाही. तो केवळ अनुभवाचाच विषय आहे. आपल्या स्वानुभूतिनेच त्याची प्राप्ति होऊ शकते. एकदा जीवाला परमात्मपद प्राप्त झाले की, त्यापासून च्युत होऊन तो जीव पुनः कधीही संसारात येत नाही. निरंतर अनंतकाल, तो आपल्या परमात्मपदात स्थिर राहतो आणि परमात्मपदात पूर्णतः स्थिर होणे अथवा विलीन होणे म्हणजेच उत्कृष्ट 'समाधि' मार्ग हाय. '

**भाषाशैली**

आ. पूज्यपादांची भाषाशैली अत्यंत सरळ, सुंदर, सुबोध हृदयंगम व प्रभावशाली आहे. त्यांच्या ग्रंथातील पद्यरचना चारुतासंपन्न व प्रसादिगुणांनी युक्त आहे. त्यांचे भाषासौष्ठव मोहित करणारे असून, अत्यंत वाखाणण्यासारखे आहे. त्यांच्या ग्रंथवाचनास सरुवात केल्यानंतर तो सहजासहजी लौकर हातातून खाली ठेवावासा वाटत नाही. त्यांचे समाधिशतक, इष्टोपदेश वगैरे ग्रंथ अत्यंत मननीय आणि अभ्यासनीय असे वाटतात.

आ. पूज्यपादांनी आपल्या ग्रंथात अत्यंत कटिण गुंतागुंतीच्या व सहज न समजणाऱ्या विषयांचे अत्यंत साधे, सोपे, सरळ व मनोज्ञ विवेचन केले आहे. कांही ठिकाणी महान विषयांचा इतका व्यवस्थितरीत्या एकत्रितपणा केला आहे की जणू 'गागर मे सागर' या उक्तीची प्रतीति यावी.

खरोखरच या महान आचार्यांने अध्यात्मवाडमयाचे दोहन करुन शास्त्रसमुद्राचे मंथन करुन जे नवनीतामृत निघाले ते सर्व त्यांच्या ग्रंथातून पूर्णपणे भरलेले आहे. समाधिशतकासारख्या ग्रंथातील

गुणसमुच्चयामुळे वाचकसमूह अगदी भारुन जातो. त्यांचे अंत:करण आनंदित होऊन नित्याच्या व्यवहारात अथवा ठिकटिकाणी संसारात आपले कोठे चुकते आहे याचे सम्यग्ज्ञान होते. अज्ञानरुपी त्याचा मळ धुऊन जातो. दु:ख, संताप, शोक, चिंता इत्यादि विकारांचा नायनाट होतो. अथवा आत्म्यावर त्या विकारांचा कसलाही प्रभाव पडत नाही. उच्च विचारसरणीने ते सहजपणे स्वत:ला सावरु शकतात व समाधीच्याद्वारे स्वस्वरुपांत वावरत राहून अंतरात्मा बनून परमात्मपदास प्राप्त होतात.

आ. पूज्यपादांच्या 'समाधिशतका' सारख्या आध्यात्मिक ग्रंथाचे तरी कमीतकमी जैन बांधवांच्याकडून नित्य वाचन, श्रवण, मनन व पठण केले गेले पाहिजे. एवढी अभिलाषा येथे करण्यास काहीच हरकत नसावी.

**आचार्य यतिवृषभ**

यतिवृषभ एक महान आचार्य होउुन गेले. त्यांनी 'तिलोयपण्णत्ति' नामक महान ग्रंथाची रचना केली. करणानुयोगातील दिगंबर परंपरेचे जे सर्व ग्रंथ तयार झाले आहेत, ते 'त्रिलोकप्रज्ञप्ति' या ग्रंथाच्या आधारानेच झाले आहेत. यावरुन हे आचार्य दिगंबरपरंपरेचे असावेत, हे स्पष्ट होते, श्वेतांबर संप्रदायातील सूर्यप्रज्ञप्ति, चंद्रप्रज्ञप्ति व जंबूद्वीपप्रज्ञप्ति या ग्रंथातील विषय देखील 'तिलोयपण्णत्ति' ग्रंथाप्रमाणेच आहे. अग्गायणी, दिट्ठिवाद, परियम्म, इ. ग्रंथ या ग्रंथापूर्वीचे असावेत असे मानले जाते. परंतु अद्याप ते ग्रंथ उपलब्ध नाहीत.

आ. यतिवृषभ यांची निश्चित अशी कोठेच माहिति मिळत नाही. त्यांनी स्वत:विषयीची माहिति कोणत्याही ग्रंथाच्या प्रस्तावनेत, प्रशस्तीत अथवा अन्य ठिकाणी दिलेली आढळत नाही. त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाविषयी व कालनिर्णयाविषयी, अनेक विद्वानानी पुष्कळ विवेचन केले आहे. पं. नाथूराम प्रेमी, जुगलकिशोल मुख्तार, पं. फुलचंद्रशास्त्री, पं. महेंद्रकुमार न्यायाचार्य इत्यादि विद्वानांचा त्याबाबत आपणाला उल्लेख करावा लागेल. 'तिलोयपण्णत्ति' ग्रंथाचे कर्ते यतिवृषभाचार्यच आहेत की अन्य कोणी आहेत, याविषयी देखील मतभेद आहेत. वरील विविध विद्वानांच्या विचारांच्या साह्यानेच यतिवृषभाचार्यांची माहिति शोधणे उचित ठरेल.

आ. यतिवृषभ यांची काही माहिति आपणाला खालील दोन गाथांच्यावरुन मिळते.
पणमह जिणवरवसहं गणहरवसहं तहेब गुणवसहं । दट्ठूण परिसक्सहं जदिवसहं धम्मसुत्तपाढयवसहं ॥
चुण्णिसरुवं छक्करणसरुवपमाणं होदु किं जं तं (?) अट्ठसहस्सपमाणं तिलोयपण्णत्तिणामाए ॥

अर्थात् 'जिनवृषभाला, श्रेष्ठ गणधर वृषभाला तसेच परिषह सहिष्णु आणि धर्मसूत्रपाठकांच्यामध्ये श्रेष्ठ अशा यतिवृषभाला नमस्कार करा. चूर्णिस्वरुप तथा षटकारणस्वरुपाप्रमाणेच त्रिलोकप्रज्ञप्तीचा आठ हजार, श्लोक एवढा विस्तार आहे.'

कर्त्याने आपले नाव यतिवृषभ (जदिवसह) असे प्रकट केले आहे. इंद्रनंदीने श्रुतावतारात यतिवृषभाला कषायप्राभृत नावाच्या द्वितीय श्रुतस्कंधाच्या चूर्णीचा कर्ता प्रकट म्हटले आहे. नागहस्ति व आर्यमंक्षु मुनींच्यासाठी गुणधर आचार्यांने जे व्याख्यान सांगितले ते या दोन मुनींच्याजवळ यतिवृषभाने वाचले असावे व त्यांनी ६००० श्लोकांनी युक्त चूर्णिसूत्र लिहिले असावे.

जयधवला टीकेत यतिवृषभाला वृत्तिसूत्रकर्ता म्हटले असून त्याच्याकडून वर मागितला आहे "सो वित्तिसुत्तकत्ता जइवसहो मे वरं देइ ।" तसेच यतिवृषभाला आर्यमंक्षुचा शिष्य व नागहस्तीचा अंतेवासी म्हटले आहे.

धवला टीकेत यतिवृषभाच्या मतांचा अनेक ठिकाणी उल्लेख केला असून तिलोय-पण्णत्तीचा देखील उल्लेख करुन त्यातील अनेक गाथा उदधृत केल्या आहेत.

'तिलोयपण्णत्ती' च्या ७७ व्या गाथेनुसार हा ग्रंथ आठ हजार श्लोकांनी युक्त असावा आणि पूर्वार्धानुसार असे समजते की, हे प्रमाण चूर्णि आणि करणस्वरुपाएवढेच आहे. इंद्रनंदीने चूर्णिसूत्रांचे प्रमाण सहा हजार श्लोक इतके सांगितले आहे. म्हणून करणस्वरुपाचे प्रमाण एवढेच असावे. यतिवृषभाचा करणसूत्र

हा गणितासंबंधी एखादा ग्रंथ असावा. डॉ. हिरालालजींच्या मतानुसार करणसुत्र म्हणजे गणिताचा 'फार्म्यूला ' तिलोयपण्णत्तीमध्ये आपणाला काही करणगाथा सापडतात.

आ. यतिव
षभाविषयी दिलेल्या दोन गाथानुसार यतिवृषभाचार्य धर्मपाठकांच्या मध्ये श्रेष्ठ होते आणि चूर्णिसूत्रावरून ते एक प्रगल्भ आणि प्रौढ सूत्रकार असल्याचे दिसते. शिवाय जनशास्त्रांच्या विषय अभ्यासावरून त्यांचे विस्तृत व गाढ अध्ययन आपल्या दृष्टोत्पत्तीस येते. आ. यतिवृषभ ग्रंथरचना करीत असताना त्यांच्या समोर 'लोकविनिश्चय' , लोकविभागसारखे ग्रंथ असावेत. त्यांनी आता उपलब्ध नसलेल्या अनेक प्राचीन ग्रंथाचा आपल्या ग्रंथात उल्लेख केला आहे. आपल्या 'तिलोयपण्णत्ति' ग्रंथाची रचना प्राचीन ग्रंथांच्या आधाराने तसेच आचार्य परंपरेने केली असावी. तत्कालीन विषयांचे सूक्ष्मज्ञान त्यांना होते हे येथे स्पष्ठ होते. प्रवचनवात्सल्यानेच त्यांनी चूर्णिसूत्रांची रचना केली असावी.

## काल-

चूर्णिसूत्रकार व तिलोयपण्णत्तीचे कत यतिवृषभाचार्य यांच्या काळाविषयी निश्चित माहिती सांगणे अत्यंत कठिण आहे. तरीसुध्दा 'तिलोकपण्णत्ति' हा ग्रंथ सर्वनंदीच्या 'लोकविभाग' ग्रंथानंतरचा असावा. तिलोयपण्णत्तीमध्ये लोकविभाग ग्रंथाचा पाच वेळा उल्लेख आला आहे. 'लोकविभाग' ग्रंथ सर्वनंदीचाच असेल तर त्याची रचना श. संवत ३८०मध्ये झाली असावी. तिलोयपण्णत्तीच्या कालगणनेनुसार कल्कि राजाचा मृत्यु वीरानिर्वाणानंतर एक हजार साधारण श. सं. ४०० (वि.सं. ५३५) नंतर तिलोकपण्णत्तीची रचना झाली असावी. अर्थात् सर्वनंदीच्या लोकविभाग ग्रंथानंतर २० वर्षानी ही रचना झाली असावी. '

श्वेताम्बराचार्य जिनभद्रगणि क्षमाश्रमणाने आपल्या विशेषावश्यक भाषाची रचना वि.सं. ६६६ मध्ये केली. त्यांनी यतिवृषभाच्या चूर्णिसूत्राचा 'केचित्' म्हणून उल्लेख केला आहे. यावरुन यतिवृषभ वि. सं. ६६६ च्या पूर्वी होऊन गेले असावेत. अर्थात् ५३५ आणि ६६६ च्या दरम्यान त्यांचा काल निश्चित करावा लागेल. '

याशिवाय डॉ. हिरालाल जैन व डॉ. अे. उपाध्ये यांच्या मते त्रिलोकप्रज्ञप्तीची रचना सर्वनंदीच्या लोविभाग ग्रंथाच्या नंतर तथा वीरसेनकृत धवलाच्या पूर्वी शके ३८० ते ७३८ च्या मध्यंतरास झाली असावी.

## आ. यतिवृषभाची गुरुपरंपरा-

आ. यतिवृषभांची गुरुपरंपरा देखील आपणाला निश्चितपणे सांगता येत नाही. कषायप्राभृत अध्ययनाची आयार्च परंपरा सांगताना श्रुतावतार कर्ता इंद्रनंदीने दोन गाथा उद्धुत केल्या आहेत. त्या गाथेनुसार आ. यतिवृषभानीं नागहस्ति आणि आर्यमंक्षूच्या (कषायप्राभृत) सुत्रांचे अधयन करुन शास्त्रार्थात निपुणता प्राप्त केली होती. येथे 'यतिवृषभ' शब्दावर श्लेष असल्याचे समजले जाते. तरी सुध्दा त्याच कषायप्राभृतावर तृत्तिरुपाने त्यांनी चूर्णिसूत्रांची रचना केली. ती ६ हजार श्लोक प्रमाण इतकी असावी. ही गोष्ट इंद्रनंदीव्दारेच नाही तर स्वतः जयधवला टीकेव्दारे सिध्द झाली आहे. यतिवृषभ आर्यमंक्षु व नागहस्ति यांचे साक्षात् शिष्य असून त्यांचा आशीर्वाद धवलाकाराने घेतलेला दिसतो. वीरसेन व जयसेनकृत जयधवला टीकेत यतिवृषभांच्या चूर्णिसूत्रांचा उल्लेख मिश्ररुपाने आलेला आढळतो.

कषायापाहुड चूर्णीचा अथवा ' तिलोय-पण्णत्ति' ग्रंथाचा कर्ता कोण याविषयी सखोल व व्यवस्थित माहिती मिळत नाही. 'तिलोयपण्णत्ति' मध्ये श्लेषरुपाने जी गाथा पाहावयास मिळते त्याचप्रमाणे एक गाथा जयधवलामध्येही आहे. या दोन गाथेत कषायप्राभृत गाथांचा कर्ता गुणधर आचार्य असल्याचा उल्लेख अन्तर्निहित असावा. यतिवृषभांचा गुणधरांच्याविषयी मोठा आदरभाव असल्याचाही उल्लेख मिळतो. त्या दोघांच्यातील संबंध आपणाला समजत नाही. ते समकालीन असल्याचेही कोठे दिसून येत नाही. वीसेनाच्या

मतानुसार यतिवृषभ आर्यमंक्षूचे शिष्य व नागहस्तीचे अंतेवासी असावेत. अर्थात् यावरुन नागहसतीचे ते साक्षात् शिष्य अथवा समकालीन असावेत.

## जीवनकथा-

हरिषेणाच्या बृहत्कथाकोशाच्या १५६ व्या गाथेत आणि नेमिदत्ताच्या आराधना कथाकोशाच्या ८१ व्या कथेत यतिवृषभाच्या सामाधिमरणाविषयी माहिती मिळते. अर्थात् हे यतिवृषभ 'तिलोयपण्णत्ति कर्ते यतिवृषभच आहेत की, अन्य कोणी हा वादग्रस्त प्रश्न आहे.

'राजा जयसेन प्रथम बौध्द भिक्षु शिवगुप्ताचा शिष्य होता. एके वेळी यतिवृषभ आपल्या संघासह श्रावस्ती नगरीला आले. त्यांचा उपदेश ऐकून जयसेनाला जैधर्माविषयी श्रध्दा उत्पन्न झाली हे शिवगुप्ताला बरे वाटले नाही. त्यांने  शेजारील बौध्द राजा सुमतीला भडकविले आणि त्याने जयसेनाला पत्र पाठविले की, तू पुनः बौध्द धर्म स्वीकारावा. परंतु जयसेनाने ते ऐकले नाही. तेव्हा सुमतीने येऊन श्रावस्तीला घेरले. त्याने सैन्याला उद्देशून म्हटले की, माझ्या सेनेत जयसेनाला कोणी मारणारा आहे काय? त्यावेळी अहिमारक नावाच्या बुध्दोपासकाने ते ते काम स्वीकारले आणि त्याने कपटाने यतिवृषीाजवळ जिनदीक्षा घेतली वंदना करण्यासाठी आला असता त्यांनी विचार केला की, हा घात आत्मघाताशिवाय शांत होणार नाही. त्यांनी राजाच्या रक्ताने तेथील भिंतीवर लिहिले की, 'मुनीवेषात हे जे वाईट कर्म केले आहे ते धुऊन काढण्याचा दुसरा मार्ग नाही' असे म्हणून त्यांनी त्याचवेळी तलवारीने आपला वध करुन घेतला.

हे यतिवृषभ कदाचित दुसरे असतील, पण 'दुट्ठपरीसहवसहं' हे विशेषण त्यांच्या कठिण परीषहांच्या कडे मन आकर्षित करुन घेते. याविषयी सखोलतेने पाहणे अत्यावश्यक आहे. '

## तिलोयपण्णति ग्रंथपरिचय-

तिलोयपण्णत्ति हा करणानुयोगातील एक प्रमुख ग्रंथ असून, भारतीय साहित्याचा हा एक प्राचीन ग्रंथ मानावा लागेल. या ग्रंथाची भाषा प्राकृत असून यातील मुख्य विषय 'विश्वरचना लोकस्वरुप' हा आहे. प्रसंगानुसार या ग्रंथात धर्म व संस्कृतीविषयी संबंध असणाऱ्या अन्य विचारांची चर्चा देखील केली आहे. या ग्रंथात तीन लोकांचे वर्णन विस्तृतपणे केले असून ते९ महाधिकारात विभाजित केले आहे.

१) सामान्य लोकाचे स्वरुप २) नारकलोक ३) भतनवासी लोक ४) मनुष्यलोक ५) तिर्यग्लोक ६) व्यनतरलोक  ७) ज्योतिर्लोक ८) देवलोक ९) सिध्दलोक

'तिलोयपण्णत्ति' मध्ये प्रामुख्याने जैन भूगोल आणि खगोल यांचे विवेचन केले आहे. पण त्याचबरोबर जैन सिध्दांत, पुराण तथा इतिहास इत्यादि विषयावर देखील लक्ष केंद्रित केलेले दिसते.

सामान्य लोक महाधिकारात २८३ पद्य आणि ३ गध भाग आहेत. प्रथम पाच गाथात पाच श्रेष्ठ गुरुंना नमस्कार करुन त्रिलोकप्रज्ञप्तीचा विषय सांगितला आहे. त्यानंतर ज्ञानाला प्रमाण, ज्ञात्याच्या अभिप्रायाला नय आणि जीवादि पदार्थाच्या व्यवहार उपायाला निक्षेप म्हटले आहे. उपमानाचे आठ प्रकार सांगून पुढे परमाणूचे स्वरुप सांगितले आहे. योजनांचे प्रमाण सांगून सहा द्रव्यांनी व्याप्त लोकाचे अधः, ऊर्ध्व व तिर्यक् असे तीन प्रकार सांगून त्यांच्या विस्ताराविषयी चर्चा केली आहे.

नारकलोल महाधिकारात ३६७ पद्यें आहेत. त्यात त्रसनालिकेचा निर्देश करुन रत्नप्रभादि सात नरकाविषयी माहिती दिली आहे. या नरकातील नारकीयांची संख्या देखील सांगितली आहे. नरकातुन निघालेले जीव कर्मभूमींतील गर्भज, संज्ञी , पर्याप्त, तिर्यच व मनुष्य होतात. नारकी जीव बलदेव अथवा चक्रवर्ती होत नाही. संख्यात वर्षाचे व विविध पशुयोनीत जाणरे जीव पुनः नरकात उत्पन्न होतात.

कषायांच्यामुळे नरकबंध होतो. नारकी जीवाना कृष्ण, नील, कापोत या लेश्या प्राप्त होतात. त्यानंतर नारकीयांचे जन्मस्थान, आकार, विस्तार याविषयी माहिती देखील त्यानी दिली आहे.

भवनलोक महाधिकारात २४३ पधे आहेत. यात भवनावासी देवांचे निवक्षेत्र, त्यांचे भेद, चिन्हें, भवनसंख्या, इंद्रांचे प्रमाण, नाम , त्यांचे भवन,अल्पध्दिंक , महध्दिक, मध्यमध्दिक भवनवासी देवांच्या भवनांचे वर्णन व सम्यग्दर्शनग्रहणाचे कारण सांगितले आहे. तीर्थकर, संघ तथा आगमग्रंथादि विषयांचे प्रतिकूल आचरण करणारे दुर्विनयी मायाचारी जीव किल्विष देवात उत्पन्न होतात तर क्रोध,मान,माया,लोभ यात आसक्त राहणारे व वैरभाव स्वीकारणारे जीव असुर म्हणून जन्मतात. विविध देवदेवतासह जिनप्रतिमांचे दर्शन करुन सुखांचा उपभोग घेतात.

नरलोक महाधिकारात मनुष्य लोकाचा निर्देश, जंबूव्दीप,लवणसमुद्र, धातकिखंड, कालोद समुद्र, पुष्करार्ध व्दीप, या व्दीपातुन स्थित मनुष्यांचे भेद, संख्या,गुणस्थानादि आयुर्बन्धाचा परिणाम, योनि, सुख,मोक्षाला जाणाऱ्या जीवांचे प्रमाण, अशा अनेकविध १६ अधिकारांचे वर्णन आहे. या महाधिकराची समस्त पधसंख्या २९६१ इतकी आहे. मध्यंतरी थोडा गधभागही आला आहे.

तिर्यग्लोक महाधिकारात ३२१ पधें आहेत. यात गध भागच अधिक आहे. या महाधिकारात १६ उपाधिकाराव्दारे तिर्यग्लोकाचे विस्तृत वर्णन केले आहे. स्थावरलोकाचे प्रमाण सांगताना आकाशात जेथपर्यत धर्म व अधर्म द्रव्य निमित्ताने होणारी जीव आणि पुद्गल गति व स्थिती शक्य आहे तो सर्व स्थावरलोक आहे. त्यांच्या अध्यात सुमेरु पर्वताच्या मुळापासु